आशियातील सर्वात मोठ्या स्वयंसेवी ग्राहक संघटनेचे मुखपत्र

RNI No. MAHBIL/2011/39044

वर्ष १० | अंक १२ | मार्च २०२२ | मूल्य रु. ५/-

# Grahak Tituka Melwawa

# ग्राहक तितुका मेळवावा

मुंबई ग्राहक पंचायत

ग्राहक हिताय
ग्राहक सुखाय

Consumers International
Member of Consumers International




## तुमची स्टॅम्प ड्युटी बिल्डरने भरायची आहे का?

# एम.आर.पै पुरस्कार विजेत्यांचे अभिनंदन



### श्री. शिरीष मुळेकर

आपण संस्थेतर्फे महारेरा सलोखा मंचाद्वारे ग्राहकांना दिलासा देताना जे विशेष प्रयत्न केले आणि कल्पकता दाखवली ती प्रशंसनीय असुन अन्य कार्यकर्त्यांसाठी प्रेरणादायी आहे.



### डॉ. अर्चना सबनीस

आपण संस्थेत राज्य, राष्ट्रीय आणि जागतिक स्तरावर बहु-आयामी ग्राहक संरक्षणासाठी ज्या सातत्याने, निःस्वार्थी वृत्तीने योगदान देऊन ग्राहकांना दिलासा देत आहात ते निश्चितच प्रशंसनीय आणि अन्य कार्यकर्त्यांसाठी प्रेरणादायी आहे.



### श्रीम. वसुंधरा देवधर

आपण संस्थेत ग्राहक शिक्षणाद्वारे ग्राहक संरक्षणासाठी जे बहुमोल योगदान सातत्याने देत आहात ते निश्चितच कौतुकास्पद आणि अन्य कार्यकर्त्यांसाठी प्रेरणादायी आहे.



### श्री. राजेंद्र राणे

आपण संस्थेत गेली अनेक वर्षे विविध जबाबदाऱ्या सांभाळत ग्राहक संरक्षणासाठी आपल्या व्यावसायिक कलात्मक कौशल्याचे योगदान निःस्वार्थ वृत्तीने देत आहात ते निश्चितच प्रशंसनीय आहे.



### श्रीम. पूजा जोशी-देशपांडे

आपण ग्राहकांचे न्यायालयीन लढे यशस्वीपणे लढवून बाधित ग्राहकांना न्याय मिळवून देण्यासाठी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. वैद्यकीय हलगर्जीपणामुळे बाधित महिलेला नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी आपण आपले कायद्याचे कौशल्य, सखोल अभ्यास आणि चिकाटी पणाला लावली हे निश्चितच इतरांना प्रेरणादायी आहे.



### श्रीम. अनिता खानोलकर

आपण संस्थेत गेली अनेक वर्षे विविध जबाबदाऱ्या सांभाळत अत्यंत कुशलतेने ग्राहक संरक्षणासाठी सुद्धा ज्या सातत्याने आणि निःस्वार्थी वृत्तीने आपले योगदान देऊन ग्राहकांना दिलासा देत आहात ते निश्चितच प्रशंसनीय आणि अन्य कार्यकर्त्यांसाठी प्रेरणादायी आहे.

## मुंबई ग्राहक पंचायत

**विश्वस्त मंडळ**
डॉ. अनिल काकोडकर
डॉ. बाळ फोंडके
ललिता कुलकर्णी
रविंद्र महाजन
अनुराधा गोरे

**अध्यक्ष**
डॉ. बाळ फोंडके

**उपाध्यक्ष**
अनुराधा गोरे

**कार्यकारी मंडळ**
ॲड. शिरीष देशपांडे (स्वीकृत कार्याध्यक्ष)
अनुराधा देशपांडे (कार्योपाध्यक्ष)
प्रभाकर गवाणे (कार्योपाध्यक्ष)
अनिता खानोलकर (कार्यवाह)
छाया वारंगे (कार्यवाह)
रविंद्र सहस्रबुद्धे (खजिनदार)

**सभासद**
ज्योती मोडक, शीला देवळेकर
राजेंद्र राणे, शुभदा चौकर,
अनघा आचरेकर, विनायक सोमण,
गजानन वर्तक, विवेक केळकर,
शर्मिला रानडे, आलोक हर्डीकर (स्वीकृत),
अभय जोशी, पराग रेडकर,
अर्चना पानगांवकर (स्वीकृत)

**निमंत्रित**
- *अध्यक्ष, खरेदी समिती*
- *शिक्षण विभाग प्रमुख*
- *समन्वयक पर्यावरण विभाग*

या अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी संपादक/ संघटना सहमत असतीलच असे नाही.


# अनुक्रमणिका


ग्राहक तितुका मेळवावा
१ मार्च २०२२
माघ/फाल्गुन १९४३



| | |
|---|---|
| संपादकीय | ५ |
| घर खरेदीदार ग्राहकांची विकासकांतर्फे तीन हजार कोटींची फसवणूक | ६ |
| एम. आर. पै पुरस्कार विजेत्यांचे अभिनंदन | ७ |
| राधा कुलकर्णी यांची झेप | ७ |
| मधुकरराव मंत्री जन्मशताब्दी सोहळा | ८ |
| इंधन-चूल जोडगोळी! | १२ |
| निबंध स्पर्धेतील विजेत्यांचे अभिनंदन | १३ |
| कशी असावी आपली दिनचर्या? | १४ |
| चला, झाडे जागी झाली, कामाला लागा! | १५ |
| गुंतवणूक: हे लक्षात घ्या! | १६ |
| वाचू आनंदे | १७ |
| प्लास्टिक संकलनाला चालना | १८ |
| उत्पादक असे घडतात! | १९ |
| FSSAI's Stand on GM Food | २१ |
| MGP seeks transparency in premium waiver | २२ |
| CI theme- Fair Digital Finance | २३ |


१५ मार्च,
जागतिक ग्राहक हक्क दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा!

## दापोली पेठ

दोन वर्षांच्या प्रतीक्षेनंतर आपल्या पंचायत पेठा परत सुरू झाल्या आहेत. पुण्यापाठोपाठ आता दापोली येथे पंचायत पेठ आयोजित करण्यात आली आहे. दणक्यात प्रतिसाद द्या आणि ही पेठ यशस्वी करा.

**२ मार्च ते ६ मार्च २०२२ टिळक स्मारक हॉल, फॅमिली माळ, दापोली – वेळ सकाळी ११ ते रात्री ८.३०**


❖ संपादक :– शुभदा चौकर
❖ संपादकीय साहाय्य :– सुमिता चितळे, शर्मिला नाईक
❖ सल्लागार :– ॲड. शिरीष देशपांडे, वसुंधरा देवधर
❖ मुखपृष्ठ :– राजेंद्र राणे
❖ अक्षरजुळणी व रचना, कला व मुद्रण :– इंडिया प्रिंटिंग वर्क्स, वडाळा, मुंबई

Printed & Published by **NISHIKANT VINAYAK GURJAR** on behalf of **Mumbai Grahak Panchayat,** Printed at India Printing Works, 42 G. D. Ambekar Marg, Wadala, Mumbai - 400 031 and Published at Mumbai Grahak Panchayat, Grahak Bhawan, Sant Dnyaneshwar Marg, JVPD Scheme, Juhu, Vile Parle (West), Mumbai - 400 056 Ph.: 26288624, 26281832, Fax : 26250916. • Email : mpanchayat@gmail.com • Vitaran Email : mgpvitaran@yahoo.co.in • Website: **mymgp.org** • Editor : **Shubhada Chaukar**

# ठाणे वितरण केंद्र - महत्त्वाची सूचना

**ठा**णे वितरण केंद्राअंतर्गत सर्व सभासदांना आपली तक्रार नोंदविण्यासाठी वस्तू, पेमेंटस्, वितरण, मासिक बिल इ. बाबत सूचना, अभिप्राय, तक्रार इ. बाबत सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे.

**ठाणे वितरण केंद्र ईमेल**

**tvktakrar@gmail.com**

**मोबाईल नंबर – ९९६९५२७४४८**

**(व्हॉट्सॲपद्वारे तक्रार नोंदविण्यासाठी)**

संघ ग्रुपवरील तक्रारींची यापुढे दखल घेतली जाणार नाही. सभासदांनी आपली तक्रार संघ प्रमुखाद्वारेच दिलेल्या क्रमांकावर किंवा इमेलवर पाठवावी.

**– कार्यवाह, ठाणे वितरण केंद्र**



## डॉ. बाळ फोंडके यांचे अभिनंदन

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार योजनेअंतर्गत शासनाकडून जाहीर करण्यात आलेल्या सन २०२०च्या राज्य वाङ्मय पुरस्कारांमध्ये विज्ञान व तंत्रज्ञान या वाङ्मय प्रकारासाठी दिला जाणारा महात्मा ज्योतिराव फुले पुरस्कार आपले अध्यक्ष डॉ. बाळ फोंडके यांच्या ‘करोनाष्टक’ या पुस्तकास जाहीर झालेला आहे. त्याबद्दल फोंडके सरांचे मनःपूर्वक अभिनंदन.

## जेके पॅरेडाइज ग्राहक संघ

आमच्या ‘जेके पॅरेडाइज’ या संघाला पाच वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्त आम्ही ३ फेब्रुवारी २०२२ रोजी एक छोटासा कार्यक्रम आयोजित केला होता. या उपक्रमाला आमच्या बाराही सभासद आपल्या मैत्रिणींसहित अत्यंत उत्साहाने



सामील झाल्या. आमच्या सोसायटीतील सदस्य आपल्या घरातील प्लास्टिक बाजूला काढून ठेवतात व सोसायटीतील एक विद्यार्थिनी तो गोळा करून रिसायकलसाठी एका कंपनीला गोखले कॉलेजच्या माध्यमातून सुपूर्त करते. वर्षभरामध्ये तिने तीन वेळेला मिळून ११६ किलो प्लास्टिक कचरा दिला. हे सर्व संघाच्या सभासदांमुळे व सोसायटीतील सर्व सदस्यांच्या पाठींब्यामुळे शक्य झाले.

महत्त्वाचं म्हणजे मुंबई ग्राहक पंचायतीच्या संघामुळे आमच्या सोसायटीमध्ये एकोपा राखण्याची संधी आम्हाला मिळते.

**– माधुरी वैद्य,** *बोरीवली*

## शेगडी बदलून मिळाली

तक्रार अशी सुटली....

मी ७ ऑक्टोबरला प्रेस्टिज कंपनीची शेगडी १५ हजार ७०० रुपयांना घेतली, पण पहिल्या दिवसापासून शेगडीला खूप प्रॉब्लेम होता. कंपनीकडे बऱ्याचदा तक्रार देऊन देखील कोणी दखल घेत नव्हते. म्हणून मी आपल्या संस्थेच्या गोरेगांवच्या ग्राहक तक्रार निवारण केंद्राशी संपर्क साधला. उदय चितळे यांनी स्वतः लक्ष घालून मला न्याय मिळवून दिला मला शेगडी बदलून मिळाली. मी ग्राहक पंचायतीची आणि उदय चितळे यांची आभारी आहे.



**– रजनी वाघ,** *गोरेगांव*

संपादकीय

# सेतू बांधा रे

'मोड आलेली कडधान्ये निवडून घ्यायची असतात!'
'डाळ नीट शिजत नाही? असे कसे?'
...आमची तर डाळ हमखास शिजते आणि आमच्या कडधान्यात कधीच चाड नसतात. कारण आम्ही फक्त मुंबई ग्राहक पंचायतीच्या वाटपातील सामान घेतो.

अशी शेखी आपण कायम मिरवतो. कारण आपल्या निवड समितीने चोखंदळपणे पसंत केलेला माल आपल्याला मिळतो. सर्व सभासदांसाठी एकत्रित आणि थेट खरेदी केल्याचा फायदा म्हणून आपल्याला दर किफायतशीर मिळतो. शिवाय दर्जाच्या बाबतीत आपण किती काटेकोर आहोत हे माहीत असल्याने प्रत्येक व्यापारी/उत्पादक आपल्याला उत्तम तेच देऊ करतो. जे हा संकेत ओलांडतात, त्यांना आपण समज देतो, प्रसंगी अव्हेरतो. आपल्या सर्व सभासदांच्या घरी उतम वस्तू पोचवाव्या, यासाठी काळजी घेणारी आपली संस्था आहे, हा केवढा मोठा फायदा आहे आपला!

आपले संस्थापक सदस्य मधु मंत्री यांच्या जन्मशताब्दी सोहळ्याचा कार्यक्रम ऑनलाईन बघितलेल्यांना व या अंकात त्याचे जे वृत्त प्रसिद्ध झाले आहे ते वाचणाऱ्यांना समजेल की ही अशी संस्था उभारण्यासाठी त्यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी किती कष्ट केले! १९७५ पासून आपल्या संस्थेचा आलेख चढता आहे.

वेळोवेळी अनेक आव्हाने आली. मॉल संस्कृती, व्यापाऱ्यांची प्रलोभक जाहिरातबाजी आणि आता तर ऑनलाईन बाजारपेठ! या आधीची अनेक आव्हाने आपण यशस्वीरित्या पेलली आहेत. आताचे आव्हान खूप मोठे आहे. बसल्या जागी स्मार्ट फोनची बटने दाबून खरेदी करण्याची सोय आहे. घरपोच कोणतीही वस्तू मिळत आहे. सहज-सुकर खरेदीच्या तुलनेत आपली वितरण यंत्रणा थोडी कष्टाची आहे.

पण 'कष्टाविण फळ ना मिळते' याची प्रचिती आपणा सदस्यांना पुरेपूर येत आहेच. आपली मागणीची नोंदणी ते सामानाची प्राप्ती हा कालावधी मोठा आहे. पण त्यामागचे कारण व प्रक्रिया समजून घेतली तर जाणवेल की म्हणूनच तर आपल्याला मनासारखा माल मिळतो. म्हणजे आपण तिखट-हळदीची मागणी नोंदवली की मग हळकुंड, मिरच्या यांची खरेदी आपली निवड समिती स्वतः उत्पादकांकडे जाऊन करते. मग योग्य प्रमाणात दळायला देते आणि त्यानंतर आपल्या कर्मचाऱ्याच्या देखरेखीखाली पॅक झालेले शुध्द ताजे हळद-तिखट आपल्या घरी येते.

आरोग्यदायी, गुणकारी घटकांचा विचार करून खरेदी होते, म्हणूनच तर आपल्या वाटपात 'जंक फूड' नसते.

आपल्या पोटाची अशी काळजी घेणारी आपली संस्था आपल्यासह सर्व ग्राहकांना सुजाण, सतर्क करण्यासाठी विविध कामे करते. ग्राहकांचे हक्क अबाधित राखण्यासाठी व फसवणुकीपासून रक्षण करण्यासाठी सातत्याने झटत असते.

खात्री आहे, अशा संस्थेचे सभासद असल्याचा अभिमान बाळगणारा एकही सभासद संस्था सोडून जाणार नाही. आठवणीने नूतनीकरण करेल. आणि हो, स्वतः सह इतरांना उद्युक्त करेल. आपल्या संस्थेचे सभासद होण्यासाठी आप्त मित्रांना प्रेरित करेल!

मधुकर मंत्री यांना श्रध्दांजली हीच की अधिकाधिक सभासद करणे, अधिकाधिक संघ स्थापन करणे!

आधुनिकीकरणाची कास धरून काही सुधारणा करण्याचे प्रयत्न आपले कार्यकर्ते करत आहेत. त्याला दाद देऊया आणि साथही!

श्रध्दांजलीचे एकेक पुष्प म्हणून एकेक तरी सभासद आपण प्रत्येकाने संस्थेशी जोडूया. करणार ना इतकं?

आपले सुप्रसिध्द संस्थापक सुधीर फडके उर्फ बाबूजी यांच्या गाण्यातले 'सेतू बांधा रे' हे वचन सार्थ ठरवण्याची क्षमता आपल्यातच आहे!

**– शुभदा चौकर**

# घर खरेदीदार ग्राहकांची विकासकांतर्फे तीन हजार कोटींची फसवणूक

**– शिरीष देशपांडे**, *कार्याध्यक्ष*

विविध कारणांनी रखडलेले गृहनिर्माण प्रकल्प गतिमान करण्याच्या उद्देशाने राज्य सरकारने फेब्रुवारी २०२१मधे फंजीबल चटई क्षेत्रावर विकासकांनी भरायच्या अधिमुल्यात (प्रिमियम शुल्कात) घसघशीत ५० टक्के सवलत जाहीर केली.



या योजनेला मुंबई महानगरातील बहुतेक सर्वच विकासकांनी प्रतिसाद दिला. गेल्या वर्षभरात विकासकांनी या सवलतीचा फायदा घेत ५० टक्के अधिमूल्य भरून रखडलेल्या गृहनिर्माण प्रकल्पांना गती देण्यासाठी पावले उचलली खरी, परंतू या योजनेअंतर्गत सवलत घेणाऱ्या विकासकांसाठी, या प्रकल्पात सदनिका/गाळे घेणाऱ्या ग्राहकांचे संपूर्ण मुद्रांक शुल्क विकासकांनीच भरायचे ही मुख्य अट होती. इतकेच नाही तर ग्राहकाने देय असलेले मुद्रांक शुल्क हे विकासकाने प्रत्यक्षात भरले आहे असे प्रमाणपत्र संबंधित ग्राहकांकडून घेऊन ते संबंधित खात्यात आणि महारेराकडे सादर करणेसुद्धा बंधनकारक केले होते. याही पुढे जाऊन विकासकांनी ही सर्व माहिती त्यांच्या संकेत स्थळावर प्रदर्शित करणेसुद्धा बंधनकारक केले होते. परंतु बहुधा सर्वच विकासकांनी या

## परतावा द्यावा १५ दिवसांत

प्रीमियम सवलतीचा लाभ घेऊन नियम असतानादेखील ग्राहकांकडून मुद्रांक शुल्क वसूल करणाऱ्या बिल्डर्सना १५ दिवसांत परतावा देण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी आपण केली आहे. या संदर्भात शिरीष देशपांडे यांनी 'महारेरा' पाठोपाठ मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांना पत्र लिहिले आहे.

कोरोना संकटामुळे रखडलेल्या निवासी विकास प्रकल्पांना बळ देण्यासाठी राज्य सरकारने विकासक व बिल्डरांना मुक्त मोबदला (फंजिबल) चटई क्षेत्र निर्देशांकासाठी भराव्या लागणाऱ्या प्रीमियम शुल्कात (अधिमूल्य) ५० टक्के सवलत दिली होती. अशी सवलत घेणाऱ्या विकासकांनी संबंधित निवासी संकुलातील घर विक्रीवेळी एरव्ही ग्राहकांना भराव्या लागणाऱ्या मुद्रांक शुल्काचा भरणा स्वतः करण्याची सक्ती होती. फेब्रुवारी २०२१ मध्ये हा निर्णय घेण्यात आला. जवळपास प्रत्येक बांधकाम व्यावसायिकाने या सवलतीचा लाभ घेतला. पण ग्राहकांच्या मुद्रांक शुल्काचा भरणा न करता तो बोजा ग्राहकांवरच टाकला.

'अशाप्रकारे प्रीमियम सवलतीच्या मोबदल्यात मुद्रांक शुल्क ग्राहकांकडूनच घेणाऱ्या विकासक तसेच बिल्डर्सना त्याचा परतावा १५ दिवसांत ग्राहकांना देण्याचे आदेश द्यावेत. तसेच १५ दिवसांत हा परतावा न दिला गेल्यास वार्षिक नऊ टक्के दराने ग्राहकांना व्याज द्यावे. अशाप्रकारे फसवणूक झालेल्या ग्राहकांना स्वतः लक्ष घालून न्याय मिळवून द्यावा, तसेच ज्या विकासकाने ग्राहकांचे मुद्रांक शुल्क स्वतः भरले असेल, त्या विकासकांना त्यासंबंधीचे प्रमाणपत्र महापालिका, म्हाडा किंवा महारेराकडे १५ दिवसांत जमा करून त्याची माहिती संकेतस्थळावर प्रकाशित करण्याचे आदेश द्यावेत', अशी मागणी आपण केली आहे.

अधिमूल्य सवलतीचा लाभ उठवला असला तरी ग्राहकांतर्फे देय असलेले मुद्रांक शुल्क या विकासकांनी भरलेलेच नाही असे खात्रीलायकरित्या आढळून आले आहे. ग्राहकांची विकासकांनी भरायची मुद्रांक शुल्काची रक्कम ही अंदाजे अडीच ते तीन हजार कोटींची असावी असा अंदाज आहे.

ग्राहकांच्या अशाप्रकारे फार मोठ्या प्रमाणावर केलेल्या फसवणुकीची मुंबई ग्राहक पंचायतीने गंभीर दखल घेतली असून याबाबत महारेरा अध्यक्ष श्री. अजय मेहता यांना पत्र लिहून या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे. तसेच या सर्व विकासकांना त्यांनी आजवर किती आणि कोणत्या ग्राहकांचे मुद्रांक शुल्क भरलेले आहे आणि त्याबाबत ग्राहकांनी द्यायची प्रमाणपत्रे मागवून घ्यावी अशीही मागणी आपण महारेरा अध्यक्षांकडे केली आहे.

**फसवणूक झालेल्या ग्राहकांनी काय करावे?**

वरील प्रमाणे ज्या प्रकल्पांत ग्राहकांचे मुद्रांक शुल्क विकासकाने भरायचे असूनही ते ग्राहकांना भरायला लागले असेल, त्याबाबतीत फेब्रुवारी २०२१ नंतर घर खरेदी करून मुद्रांक शुल्क स्वत: भरले असेल त्या ग्राहकांनी भरलेल्या मुद्रांक शुल्क रकमेच्या परताव्याची विकासकाकडून लेखी मागणी करावी आणि त्याबद्दलची तक्रार महारेरा सचिवांकडे करावी.

सदर अधिमूल्य सवलत घेतलेल्या गृहप्रकल्पातील सर्व सदनिका/गाळे विकले जाईपर्यंत विकासकांना ग्राहकांतर्फे हे मुद्रांक शुल्क भरायचे आहे. त्यामुळे यापुढेसुद्धा ग्राहकांनी सदनिका/गाळा खरेदी करताना विकासकाने सदर अधिमुल्य सवलतीचा लाभ घेतला आहे का याची चौकशी करावी आणि असा लाभ घेतला असल्यास मुद्रांक शुल्क विकासकानेच भरण्याचा आग्रह धरावा, असे आवाहन सर्व ग्राहकांना आपण केले आहे.

♦

# एम. आर. पै पुरस्कार विजेत्यांचे अभिनंदन

गेल्या तीन वर्षांत ग्राहक चळवळीत उल्लेखनीय कामगिरी करून ग्राहक संरक्षणासाठी विविध प्रकारे भरीव योगदान दिल्याबद्दल मुंबई ग्राहक पंचायतीच्या सहा कार्यकर्त्यांना स्व.एम.आर.पै पुरस्कार घोषित झाले आहेत.

मुंबई ग्राहक पंचायतीचे कार्याध्यक्ष ॲड. शिरीष देशपांडे यांना २०१३ मधे एम.आर.पै मेमोरियल फाउंडेशनतर्फे ग्राहक चळवळीत वैशिष्ट्यपूर्ण योगदान दिल्याबद्दल एम.आर.पै पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. या पुरस्काराची एक लाख रुपयांची रक्कम ॲड. देशपांडे यांनी स्वत:साठी न वापरता त्या रकमेच्या व्याजातून ग्राहक संरक्षणासाठी उल्लेखनीय योगदान देणाऱ्या मुंबई ग्राहक पंचायतीच्या दोन कार्यकर्त्यांना दर वर्षी सन्मानित करण्यासाठी एम.आर. पै यांच्या स्मरणार्थ ही पुरस्कार योजना सुरू केली. कोविडमुळे गेल्या तीन वर्षांत हे पुरस्कार देण्यात आले नव्हते. ते अलीकडे जाहीर करण्यात आले. या पुरस्कारांचे स्वरुप मानचिन्ह आणि प्रशस्तीपत्र असे आहे. पुरस्कार वितरण सोहळ्याची तारीख नजीकच्या काळात जाहीर करण्यात येईल.

पुरस्कार विजेत्यांची नावे व छायाचित्रे असलेले विशेष पान क्र. २ पहा. (डिझाईन – राजेंद्र राणे)

♦

# राधा कुलकर्णी यांची झेप




आपल्या मधुकररावांची नात आणि आपल्या सदस्या ज्योत्स्ना कुलकर्णी यांची लेक राधा हिची संयुक्त राष्ट्रापर्यंतची कौतुकास्पद भरारी! राधा सध्या युनायटेड नेशन्सच्या न्यूयॉर्क ऑफिसमध्ये वित्तविषयक धोरणे ठरवण्याच्या कामात आहे. भारतात CA, MBAचे शिक्षण पूर्ण केलेल्या राधाने कोलंबिया विद्यापीठातून Masters in Public Administration केले आहे.

# मधुकरराव मंत्री जन्मशताब्दी सोहळा

– ज्योती मोडक

मुंबई ग्राहक पंचायत या जागतिक स्तरावर नावाजलेल्या स्वयंसेवी ग्राहक संस्थेचे संस्थापक सदस्य कै. मधुकरराव मंत्री यांची जन्मशताब्दी २६ जानेवारी २०२२ या दिवशी होती. त्या निमित्ताने संस्थेने त्याच दिवशी दु. ४ वाजता झूम ॲपद्वारे (कोरोना निर्बंधामुळे) एक हृद्य सोहळा साजरा केला, ज्यात कै. मधुकररावांच्या स्मृतींना अनेक मान्यवरांनी उजाळा दिला. संस्थेचे अध्यक्ष डॉ. बाळ फोंडके, कार्याध्यक्ष ॲड. शिरीष देशपांडे, संस्थेच्या विश्वस्त ललिताताई कुलकर्णी, संस्थेचे संस्थापक सदस्य शतकवीर श्री. अप्पासाहेब गोडबोले तसेच कै. मधुकररावांबरोबर काम केलेले सहकार भारतीचे




संस्थापक सतीश मराठे, 'ग्राहक हित' मासिकाचे संपादक आणि अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे सूर्यकांत पाठक, दिलीप फडके, मधुकररावांचे पुतणे आणि मुंबई ग्राहक पंचायतीच्या अंधेरी-जोगेश्वरी विभागाचे अध्यक्ष संजीव मंत्री उपस्थित होते तर, कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे होते उत्तर प्रदेशचे माजी राज्यपाल आणि मधुकररावांचे स्नेही मा. राम नाईक तसेच अरुणाचल, नागालँड व उ.पू. राज्यांचे माजी राज्यपाल पद्मनाभ आचार्य. या सर्व मान्यवरांच्या उपस्थितीने कार्यक्रमाला एका वेगळ्याच उंचीवर नेले.

कार्यक्रमाची सुरुवात अप्पासाहेब गोडबोले यांची कन्या प्रतिमा हब्बू यांच्या ज्ञानेश्वरीतील अभंग पाठाच्या अतिशय सुमधुर गायनाने झाली.

त्यानंतर श्री. मधुकररावांचे समग्र आयुष्य उलगडणारा मंत्री कुटुंबियांनी तयार केलेला एक सचित्र जीवनपट दाखविण्यात आला. या जीवनपटाने मधुकररावांच्या आयुष्यातील अनेक घटना/प्रसंग उपस्थितांसमोर उलगडले गेले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले संस्थेच्या ज्येष्ठ कार्यकारिणी सदस्या शुभदा चौकर यांनी. मधुकररावांनी वयाच्या ५० व्या वर्षी ग्राहक चळवळीतील आपल्या योगदानाला सुरुवात केली आणि कशा रितीने ग्राहक हिताला वाहून घेतले याचा आढावा त्यांनी घेतला. मुंबई ग्राहक पंचायतीची स्थापना करून संस्थेने आजपर्यंत ग्राहक हिताचे किती महत्त्वाचे उपक्रम हाती घेतले याचाही आढावा घेतला. तसेच मधुकररावांनी फुलविलेल्या या संस्थेत सर्व कार्यकर्ते निगडित आहेत, काम करीत आहेत, याचा आवर्जून उल्लेख केला.

रिझर्व बँकेच्या केंद्रीय बोर्डाचे डायरेक्टर आणि सहकार भारतीचे संस्थापक सदस्य सतीश मराठे यांनी मधुकररावांच्या स्मृतींना उजाळा देतांना मधुकररावांचे सहकारी क्षेत्रातील योगदान नमूद केले. १९७५ ते १९७७ या काळातील आणीबाणी आणि त्यावेळच्या परिस्थितीचा उल्लेख केला. तसेच सहकार भारतीमध्ये फाऊंडर मेंबर म्हणून मधुकरराव मंत्री यांनी काम केले असेही त्यांनी सांगितले. विद्यार्थी परिषदेचा कार्यकर्ता असल्यामुळे त्यांचा आणि मधुकरराव यांचा नेहमी संबंध राहिला. सहकार भारतीसाठी काम केलं तरी ग्राहक चळवळीतही सहभागी होण्याचा त्यांनी सल्ला दिला होता आणि त्याप्रमाणे ग्राहक पंचायतीचे काही काळ ते जॉईंट सेक्रेटरी राहिले असल्याचा उल्लेख त्यांनी केला आणि त्यांना आदरांजली वाहिली. सहकार भारतीच्या ट्रस्टसाठी जे ट्रस्ट डीड केले आहे, ते तयार करण्यात मधुकररावांचा मोठा सहभाग होता.

अखिल भारतीय ग्राहक पंचायत या पालक संस्थेचे ज्येष्ठ कार्यकर्ते दिलीप फडके यांनी मधुकररावांची आठवण जागवितांना मुंबईसारख्या महानगरातील जनसंघाचे नगरसेवेचे पद सोडून समाजकारणामध्ये / ग्राहक चळवळीत स्वतःला झोकून देणारा असा कार्यकर्ता म्हणून मधुकरराव आपल्या सदैव स्मरणात राहिले. तसेच नवीन कार्यकर्त्यांना उभारी देणारे मधुकरराव त्यांचा नेहमीच आदर्श राहिले. अतिशय शांतपणे पण नेमकेपणाने बोलण्याची त्यांची शैली आपल्याला विलक्षण भावली असे सांगून त्यांना आदरांजली वाहिली.

कै. मधुकररावांबरोबर बराच मोठा काळ एकत्र असलेले अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे ज्येष्ठ कार्यकर्ते सूर्यकांत पाठक यांनी १९७४-१९७५ सालच्या घटनांचा आणि त्यावेळच्या ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा उल्लेख केला. ग्राहक पंचायत पुण्यात जरी सुरू झाली तरी ती अधिक रुजली आणि फोफावली ती मुंबईच्या महानगरात. कारण मधुकररावांसारखा संस्थेला लाभलेला उत्कृष्ट संघटक, याचा त्यांनी उल्लेख केला. मधुकररावांची अनेक वैशिष्ट्ये त्यांनी सांगितली. माणसाला ते नावासकट लक्षात ठेवत असत आणि त्याला आपल्या बरोबर बांधून ठेवत. अतिशय हसतमुख आणि त्यांचे हसणे अतिशय निरागस आणि स्वाभाविक असे. माणसे हेरून त्यांना योग्य प्रकारे कामाला जोडून घेणे. तसेच सहकाराचे काम करायचे म्हणजे सर्वांना बरोबर घेऊनच पुढे जायचे हे त्यांनी मनाशी पक्के केले होते. आडनावात मंत्री आणि राजकारणात पुढारी म्हणून वावरत असले तरी वागणुकीत कधीच पुढारीपण जाणविले नाही. ते अजातशत्रू होते. वितरणात समानता/उत्पादनात वाढ/ उपभोगावर संयम या त्रिसूत्रीवर ग्राहक संघटना अधिकाधिक

## मंत्री जन्मशताब्दी - कौटुंबिक सोहळा

मुंबई ग्राहक पंचायतीचे संस्थापक सदस्य कै. श्री. मधुकरराव मंत्री यांची जन्मशताब्दी दि. २६ जानेवारी २०२२ या दिवशी होती. संस्थेतर्फे ती त्याचदिवशी संध्याकाळी झूपअॅपद्वारे साजरी करण्यात आली. त्याच दिवशी सकाळी ग्राहक भवन येथे एक छोटेखानी परंतु अतिशय हृद असा सोहळा साजरा करण्यात आला.

कोरोना निर्बंधांमुळे कार्यकारिणीचे मोजके सदस्य आणि मंत्री कुटुंबियांतील काही सदस्य या सोहळ्यास उपस्थित होते. सुरुवातीला मधुकरराव मंत्री यांच्या फोटोला हार घालण्यात आला आणि पुष्पांजली वाहण्यात आली.

मंत्री कुटुंबियांतर्फे मधुकरराव यांच्या तीनही कन्या श्रीम. मीना कामत, डॉ. ज्योत्स्ना कुलकर्णी, श्रीम. नैना कुलकर्णी तसेच मधुकररावांच्या सुना श्रीम. रंजना मंत्री, श्रीम. विद्या मंत्री, मधुकररावांचे पुतणे श्रीयुत संजीव मंत्री उपस्थित होते. आपल्या संस्थेतर्फे संस्थेचे कार्याध्यक्ष अॅड. शिरीष देशपांडे, श्रीम. छाया वारंगे (कार्यवाह, वितरण) तसेच श्रीम. शुभदा चौकर, श्रीम. ज्योती मोडक आणि श्री. आलोक हर्डीकर उपस्थित होते.

मंत्री कुटुंबियांतर्फे, मधुकररावांनी स्थापन केलेल्या मुंबई ग्राहक पंचायतीच्या यशस्वी वाटचालीबद्दल आणि कार्यकर्त्यांच्या गौरवार्थ एक स्मृतीचिन्ह आणि मानपत्र भेट म्हणून देण्यात आले. संस्थेतर्फे अॅड. शिरीष देशपांडे यांनी ही भेट स्वीकारली. यावेळी मधुकर मंत्री यांची कन्या ज्योत्स्ना कुलकर्णी यांनी शब्दांजली-कौतुकाची थाप ही कविता सादर केली. त्यानंतर सर्वांनी एकत्र चहापानाचा आस्वाद घेतला.

अतिशय थोडक्यात झालेल्या या हृद्य सोहळ्यास प्रत्यक्ष उपस्थित राहण्याची संधी लाभली याचा मनस्वी आनंद झाला.



मजबूत होईल आणि तरुण कार्यकर्ते संघटनेत येतील हीच मधुकररावांच्या जन्मशताब्दी निमित्ताने खरी आदरांजली ठरेल असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.

कै. मधुकररावांचे समवयस्क, ग्राहक चळवळ आणि मुंबई ग्राहक पंचायतीतील त्यांचे साथीदार शतकवीर श्री. अप्पासाहेब गोडबोले यांनी अतिशय अस्खलित वाणीत मधुकररावांबरोबरच्या अनेक जुन्या स्मृतींना उजाळा दिला आणि उपस्थितांची मने जिंकली. या वयातही त्यांच्या संस्थेच्या स्थापनेपासूनच्या स्मृती ठळकपणे लक्षात होत्या. मधुकररावांबद्दल बोलतांना त्यांनी म्हटले की मधुकररावांनी राजकारणात त्यावेळी खूप मोठी प्रगती केली होती. परंतु बिंदुमाधव जोशी यांनी ग्राहक पंचायतीची संकल्पना सर्वांसमोर मांडली. त्यावेळी मधुकररावांनी राजकारण सोडून पंचायतीत जायचा फार मोठा निर्णय घेतला आणि त्यानंतर मागे वळून बघितले नाही. त्यांचा मनुष्यसंग्रह खूप मोठा होता. लोकांचे कल्याण करण्याची ताकद ग्राहक चळवळीत होती हे ओळखून काम अंगावर घेऊन स्वतःला झोकून दिले. वक्तृत्व ही त्यांची मोठी जमेची बाजू होती. संघ निर्माण करण्याकरिता विचारणा आली की त्या सभेला तिथे जाऊन स्वतः संबोधित करीत असत. 'ग्राहक भवन' या संस्थेच्या वास्तूकरिता महानगर पालिकेकडून प्लॉट मिळविला ह्याचाही अप्पासाहेबांनी उल्लेख केला.



मधुकररावांचे पुतणे, उपनगर शिक्षण मंडळाचे उपाध्यक्ष आणि मुंबई ग्राहक पंचायत / अंधेरी-जोगेश्वरी विभागाचे अध्यक्ष श्री. संजीव मंत्री यांनी मधुकररावांच्या स्वभावाचे अनेक पैलू उलगडले. मधुकररावांबद्दल म्हणजेच त्यांच्या बापूंबद्दल बोलतांना, ग्राहक संघाचे तसेच जनसंघाचे मोठे काम करणारे बापू कुटुंबात मात्र अगदी साधेपणाने रहात असत असे सांगितले. राजकारणात असल्यामुळे फार मोठी मंडळी मधुकररावांकडे यायची, पण त्याची हवा मुलांमध्ये जाणार नाही याची काळजी मधुकररावांनी घेतली. उत्तम संस्कार त्यांनी मुलांमध्ये रुजवले. संघटन कौशल्य हा बापूंचा आणखी एक गुण असल्याचा उल्लेख त्यांनी केला. समोरच्या माणसामध्ये विश्वास निर्माण करून त्याला मित्र बनवायचे हा त्यांचा हातखंडा तर कार्यकर्त्यांच्या घरी जाऊन संपूर्ण कुटुंबाला कार्यकर्ते बनवायचे ही त्यांची खासियत. असे स्वभावाचे अनेक पैलू संजीव मंत्री यांनी उलगडले. मधुकररावांच्या मार्गदर्शनाची छत्री (Umbrella) सर्वांना मिळाली तर सर्वांच्या पाठीवर कौतुकाची थाप नेहमी दिली, असे त्यांनी आदरपूर्वक सांगितले.

संस्थेच्या विश्वस्त ललिताताई कुलकर्णी यांनी सुरुवातीला एक वाक्य सांगितले. 'श्रध्दांजली सभेत लोकांनी तुमच्याबद्दल काय बोलावं असे वाटत असेल तर त्याचा आताच विचार करा आणि तसेच आतापासून वागा' आणि म्हणाल्या मधुकररावांनी हे वाक्य वाचलंही नसेल तर पण ते नेहमी तसेच वागले. १९८३ ते २००५ या २२ वर्षाच्या संस्थेच्या कामामध्ये मधुकररावांबद्दलच्या सुखद आठवणी त्यांनी कथन केल्या. मधुकरराव कार्यकर्त्यांमध्ये रमणारे होते. कार्यकर्ते त्यांच्या समोर खुर्चीत बसून त्यांच्याशी मनमोकळेपणाने बोलायचे आणि उत्साह घेऊन परत जायचे. कार्यकर्त्यांबद्दल त्यांना अपार प्रेम होते. निर्ममवृत्ती, अजातशत्रुत्व आणि निर्मळ व्यक्तिमत्त्व असे मधुकररावांबद्दल आवर्जून सांगून त्यांना विनम्र प्रणाम केले.

अरुणाचल, नागालँड अशा उत्तरपूर्व राज्यांचे माजी राज्यपाल आणि उपनगर शिक्षण मंडळाचे अध्यक्ष पद्मनाभ आचार्य यांनी सुरुवातीला प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा उपस्थितांना दिल्या आणि मधुकररावांच्याप्रती आदरांजली वाहिली. १९८७-८८ मध्ये मुंबई ग्राहक पंचायतीला महानगरपालिकेकडून जागा मिळाली हे ऐकून त्यांना खूप आनंद झाला होता. मधुकररावांचा चेहरा अतिशय हसतमुख होता आणि त्यामुळे कार्यकर्ते त्यांच्याबरोबर काम करण्यास सहज तयार होत असत अशी आठवण त्यांनी जागविली. त्यांची काम करण्याची पध्दतही पद्मनाभ आचार्य यांना खूप भावली होती. ग्राहक हिताच्या दृष्टीने मधुकररावांनी फार मोठा पाया घातला आहे आणि जर खऱ्या अर्थाने त्यांना श्रध्दांजली वहायची असेल तर ग्राहक चळवळीत खूप मोठे काम होण्याची गरज आहे. आता असलेल्या सरकारच्या मदतीने, मधुकररावांचा आदर्श घेऊन मोठ्या मंडळींनी सहकार चळवळीत आपले योगदान द्यायला हवे आणि जनतेची सेवा करायला हवी. पूर्वांचल प्रदेशात काम व्हायला हवे असे मत व्यक्त केले. वेळेचा योग्य वापर व्हायला हवा. जनतेसाठीचे

प्रकल्प वाढवायला हवेत असे सांगून कार्यकर्त्यांना शोधायला हवे व त्यांना कामाला प्रवृत्त करायला हवे व प्रत्यक्ष कृती करून काम केले तरच ती त्यांना खरी श्रध्दांजली ठरेल, असे मत व्यक्त केले.

सोहळ्याचे प्रमुख पाहुणे व माजी केंद्रीय पेट्रोलियम मंत्री उत्तर प्रदेशचे माजी राज्यपाल आणि मधुकरराव मंत्री यांचे स्नेही मा. राम नाईक यांनी आपल्या ओघवत्या भाषणात मधुकररावांच्या अनेक आठवणी जागविल्या. मधुकररावांची स्नुषा रंजना मंत्री यांनी अनेक मान्यवरांकडून मधुकररावांवर लिहून घेतलेल्या लेखांचे पुस्तकरुपात संकलन केले. त्याचे प्रकाशन मा. राम नाईक यांनी केले. सुरुवातीला भारतीय प्रजासत्ताक दिन आणि मधुकररावांची जन्मशताब्दी असा वेगळा योगायोग आला आहे असा उल्लेख केला. सामाजिक आणि सांस्कृतिक शक्तीने प्रजासत्ताक अधिक बळकट होवो अशी प्रार्थना केली. मधुकररावांच्या सर्व कार्याचा आढावा घेऊन त्यांना श्रध्दांजली अर्पण केली. हाती घेतलेल्या कामाच्या मागे ते सातत्याने लागायचे याचा आवर्जून उल्लेख केला. ग्राहक भवन निर्माण झाल्यानंतर मधुकरराव सहजपणे ग्राहकभवनात वावरले, त्यासाठी त्यांनी गीतरामायणातील 'शिळेस म्हणतील जन सिंहासन' ही ओळ आठवल्याचे सांगितले. मधुकरराव गेल्यानंतरही अनेक उपक्रम ग्राहक पंचायतीने केले त्याचा यथार्थ उल्लेख केला. संस्थेने विविध वितरण केंद्रे स्थापन करून क्षेत्र विस्तार केला आहेच, पण संख्या विस्तारही करायला हवा असे आवाहन केले. जन्मशताब्दी निमित्ताने मधुकररावांची १०,००० संघ स्थापन करायची जी इच्छा होती ती पुरी करण्याचा प्रयत्न करायला हवा असे आवाहन केले. मधुकररावांनी भव्य दिव्य कार्य केले आहे. राष्ट्रासाठी चाललेलं हे काम अजून जोरात करावे, असे सांगून मधुकररावांना श्रध्दांजली अर्पण केली.

संस्थेचे कार्याध्यक्ष ॲड. शिरीष देशपांडे यांनी समारोपाच्या आपल्या भाषणात सदर सोहळ्याचे वैशिष्ट्य सांगतांना सोहळ्याला दोन माजी राज्यपाल लाभले तर संस्थापक सदस्य आणि शतकवीर अप्पासाहेब गोडबोले यांनी व्यक्त केलेल्या त्यावेळच्या आठवणी असा आगळा-वेगळा सोहळा असल्याचे सांगितले.

मधुकररावांच्या नावाने संस्थेतर्फे दरवर्षी उत्कृष्ट ग्राहक संघ आणि उत्कृष्ट संघ कार्यकर्ता असे पुरस्कार देण्यात येतात. कार्याध्यक्षांनी यावेळी या पुरस्कारांची घोषणा केली. कोरोना महामारीच्या दोन वर्षाच्या काळात संस्थेच्या सहाही वितरण केंद्रांनी सर्व पदाधिकारी / सदस्य / निमंत्रित यांनी अखंडपणे (एक एप्रिल महिना वगळून) सदस्यांना मासिक वितरण केले. त्या सर्वांना मधुकरराव मंत्री पुरस्कार जाहीर करण्यात आले.

मधुकररावांबद्दलच्या आठवणी जागवितांना १९८५ सालापासून त्यांच्याबरोबर काम करायला मिळाले याबद्दल त्यांनी स्वतःला भाग्यवान मानले. मधुकरराव हे दुर्मिळ व्यक्तिमत्त्व. मधुकररावांचे संस्थेतील योगदान अविस्मरणीय, उल्लेखनीय, कौतुकास्पद आणि हिमालयीन असल्याचे त्यांनी सांगितले. ग्राहकांना संघटित करणं ही सोपी गोष्ट नाही. मधुकररावांनी ते  लीलया करून दाखविले. अंगभूत गुणांचा त्यांनी कधीही कुठेही बडेजाव केला नाही. अगदी श्वास घ्यावा इतके सहजपणे मधुकरराव ग्राहक पंचायतीत वावरले. संघ स्थापन करणं हा त्यांचा ध्यास होता. संस्था आर्थिकदृष्ट्या त्यांनी स्वावलंबी केली. या इमारतीचा पाया घालण्याचे काम बिंदुमाधव जोशी, सुधीर फडके आणि मधुकरराव यांनी केलं आणि कार्यकर्त्यांच्या सहकार्याने मोठे कार्य उभे केले. मधुकररावांना खरी श्रध्दांजली कृतीतून वाहणे योग्य ठरेल असे सांगून मुंबईतील प्रत्येक भौगोलिक विभागाने प्रत्येकी ५ संघ याप्रमाणे १०० संघ आणि मुंबईबाहेरील वितरण केंद्र आणि विभागांनी प्रत्येकी किमान २० संघ उभे करायचे, असे विनम्र आवाहन त्यांनी कार्यकर्त्यांना केले. रामभाऊ नाईक यांनाही त्यांनी संख्यात्मक वाढीचे केलेले आवाहन संस्था स्विकारीत आहे असे सांगून मंत्री कुटुंबियांनाही मधुकररावांनी उभं केलेलं कार्य अजून वाढणार आहे, असे सांगून आश्वस्त केले.

मधुकरराव मंत्री यांच्या स्नुषा रंजना मंत्री यांनी आभार प्रदर्शन केले. संस्थेकडून सोहळा साजरा केला गेला आणि मान्यवरांनी मधुकररावांबद्दल गौरवोद्गार व्यक्त केले याबद्दल सर्वांचे, मंत्री कुटुंबिय आणि संस्थेतर्फे आभार मानले.

शुभदा चौकर यांनी अतिशय नीटनेटके, यथोचित असे अप्रतिम सूत्रसंचालन केले.

रंजना मंत्री यांच्या सुश्राव्य आवाजातील पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

♦

होम...
स्मार्ट होम!

# इंधन-चूल जोडगोळी!

**– डॉ. मानसी राजाध्यक्ष**
*विज्ञान-लेखिका, शिक्षिका*
*मुंबई ग्राहक पंचायतीच्या दादर, माहीम, वांद्रे विभागाच्या अध्यक्ष*

**को**ण्या एका काळी जंगलात आपोआप पेटलेल्या वणव्यात भाजलं गेलेलं मांस, फळं, कंदमुळं, भाज्या आदिमानवाने चाखल्या आणि तसंच रुचकर अन्न परत खायला मिळावं म्हणून असेल कदाचित; आदिमानवाने अग्नी पेटवण्याचा शोध लावला. तेव्हापासून आजतागायत अन्न प्रक्रियांचे आणि 'रेसिपीज'चे असंख्य प्रकार विकसित होत गेले. या सर्व प्रक्रियांमध्ये महत्त्वाची भूमिका कोणाची असेल तर 'इंधन आणि चूल' यांची! ही जोडगोळी, जगभरातल्या प्रत्येक घरात असतेच असते. फक्त तिचे प्रकार, आकार वेगवेगळे!!



मुळात मानवाला एक जन्मजात वैज्ञानिक दृष्टीकोन आहे. त्यामुळेच तर तो जगण्यासाठी जास्तीत जास्त सोयीच्या असलेल्या आणि पर्यावरणाला कमी घातक असलेल्या अनेक गोष्टींचे संशोधन करत असतो आणि त्यानुसार प्रगती घडत असते. पूर्वी लाकूड, कोळसा, शेण्या यांचा इंधन म्हणून वापर होई. शेगड्या किंवा चुलीही दगडामातीच्या लिंपून केलेल्या! यामध्ये जेव्हा इंधन जळतं, तेव्हा त्यात असलेल्या कार्बनचं हवेतल्या ऑक्सिजनशी अभिक्रिया होऊन, कार्बन'डाय'ऑक्साईड, हा वायू तयार होतो. ज्यामध्ये कार्बनच्या एका अणूशी, ऑक्सिजनचे दोन अणू बांधले जातात. म्हणजेच अशा ज्वलनासाठी पुरेसा ऑक्सिजन म्हणजेच हवेचा पुरेसा संपर्क गरजेचा आहे. परंतु पूर्वीच्या चुली या तीन बाजूंनी बंद आणि त्यामुळे हवेचा संपर्क अपूर्ण! अशा ज्वलनाची ज्योत बरीचशी पिवळी असते. आणि एवढेच नव्हे तर, अपूर्ण ज्वलनापायी खूप धूर होतो आणि कार्बन मोनॉक्साइड सारखा आपल्या प्रकृतीला अपायकारक असा वायू तयार होतो. शिवाय अपूर्ण ज्वलन झाल्यामुळे नुसते कार्बनचे बारीक कणही इतस्तत: विखुरतात आणि चुलीवरच्या भांड्यांना काळा लेप चढतो. पिवळ्या ज्योतीच्या ज्वलनामुळे आणि धुरामध्ये स्वयंपाक करणे, यातले धोके आणि गैरसोयी लक्षात घेऊन पुढे पुढे इंधनाचे 'सिलेंडर' घरोघरी दिसू लागले.

लाकूड, शेण्या, कोळसा यांच्या चुलीपेक्षा गॅस सिलेंडर आणि त्याची शेगडी ही जोडगोळी खूपच पर्यावरणपूरक आहे, आपल्या प्रकृतीलाही चांगली आहे. तरी हाताळायला धोकादायक आहे. यामुळे 'पाईप्ड नॅचरल गॅस'(PNG) हा पर्याय आता हळूहळू प्रचलित होतो आहे. इथे वायू कशात कोंबायचा नसल्यामुळे उच्च दाबाची गरज नाही, त्यामुळे अधिक सुरक्षित! आणि तो त्याच्या स्रोतापासून सिलेंडरमध्ये भरणं आणि मग घरोघरी पोहोचवणं असा जिकिरीचा प्रकार नसल्यामुळे, कमी खर्चिकही! तेव्हा 'पीएनजी' अगदी घराघरात पोहोचतो आहे. आणि ते स्वागतार्ह आहे.

आता अगदी अलीकडे विजेवर चालणाऱ्या शेगड्या बाजारात आणि काही घरांमध्ये वापरत यायला लागल्या



आहेत. इंडक्शन चुल्हा किंवा शेगडी हाही त्यातलाच प्रकार. यामध्ये कोणत्याही प्रकारच्या रासायनिक इंधनांच वहन किंवा ज्वलन करायचं नसल्याने, अतिशय सुरक्षित आणि पर्यावरणाला पूरक! कारण निळी ज्योत देणारी चूल आणि इंधन आपल्या प्रकृतीला चांगलं असलं तरी, हवेतल्या कार्बनडाय ऑक्साईडचं प्रमाण त्याने वाढतेच. तेव्हा विजेचा वापर करून, अन्न शिजवण्याचे जे काही मार्ग असतील ते सुरक्षित आणि पर्यावरणपूरक! त्यामध्ये राईस कुकर, इंडक्शन चुल्हा, मायक्रोवेव्ह अश्या काही गोष्टी मोडतात.

सर्वसाधारणपणे आपण अन्न शिजवण्यासाठी जे कोणतंही इतर इंधन वापरतो त्यापेक्षा वीज कमी खर्चिक

पडते. पण अर्थात याला अनेक पैलू आहेत. आपण किती आणि कोणत्या प्रकारचे अन्न या उपकरणाद्वारे शिजवणार आहोत, यावर ते सारे ठरते. आणि ते आपण प्रत्येकाने आपापल्या स्वयंपाकघरामध्ये काही महिने निरीक्षण, नोंदी आणि संशोधन करून ठरवायला हवे.

दुसरे म्हणजे कोळसा, लाकूड, शेण्या यांच्या चुलीवरचं अन्न आणि रासायनिक इंधनाच्या शेगडीवर शिजवलेलं अन्न यांच्या चवीत फरक असतो. कारण शेण्या, लाकूड, आणि कोळसा यांचा धूर, त्यावर शिजवलेल्या अन्नपदार्थांमध्ये मिसळतो आणि त्याचा एक वेगळा आणि छान असा स्वाद अन्नाला येतो. पण गॅस आणि वीज यांच्या शेगड्यांवर शिजवलेले चवीला रुचकर होते पण त्याला चुलीवरच्या अन्नासारखा स्वाद नसतो. अन्न शिजताना, ते गरम झाल्यावर त्यात होणाऱ्या रासायनिक प्रक्रिया या कोणत्याही प्रकारच्या इंधनाच्या असल्या तरी सारख्याच असतात. त्यामुळे विजेवर शिजवलेले अन्न, अपायकारक असण्याचे कारणच नाही.

तेव्हा अनाठायी भीती न बाळगता, तर्कसुसंगत विचार करून, आपण विज्ञान तंत्रज्ञानाच्या प्रगतीचे स्वागत, पर्यावरणाच्या आणि आपल्या प्रकृतीच्या दृष्टीने करणे, हे अतिशय गरजेचे आहे. ♦

---

# निबंध स्पर्धेतील विजेत्यांचे अभिनंदन

**मुं**बई ग्राहक पंचायतीच्या शिक्षण विभागातर्फे ग्राहक मंडळातील आणि इतर विद्यार्थ्यांसाठी पर्यावरण विषयावर ऑनलाईन निबंध आणि व्हिडियो स्पर्धा घोषित कण्यात आली होती. सातवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी या ऑनलाईन स्पर्धेचे आयोजन केले होते. मराठी, हिंदी किंवा इंग्रजी भाषेत भाग घेण्याचे स्वातंत्र्य विद्यार्थ्यांना दिले होते. विषय पुढीलप्रमाणे होते.

१. खरेदीचा अतिरेक कशाला?/खरेदीला पर्याय
२. हरीत फटाके
३. माझ्या कुटुंबाच्या पर्यावरण पूरक सवयी

यापैकी कोणत्याही एका विषयावर ३५० शब्द संख्येपर्यंत निबंध लिहायचा होता. किंवा ३ मिनिटांची एक व्हिडीयो क्लिप बनवायची होती.

या स्पर्धेसाठी चांगला प्रतिसाद मिळाला. एकूण ३० प्रवेशिका प्राप्त झाल्या. या स्पर्धेसाठी श्रीम. स्वाती टिल्लू आणि गोरेगाव विभागाच्या कार्यकारिणी सदस्य श्रीम. तनुजा गोडबोले यांनी परीक्षणाचे काम केले. त्यानुसार बक्षिसपात्र प्रवेशिका पुढीलप्रमाणे–

| | | |
|---|---|---|
| १. | जिया पाटील | वर्तक इंग्लिश मिडीयम हाय स्कूल, विरार |
| २. | प्रिया कुडतरकर | विद्यानिधी व्र.पा.हायस्कूल, जुहू. |
| ३. | सस्मिता सावंत | पार्ले टिळक विद्यालय, मुंबई |
| ४. | धनश्री चव्हाण | पार्ले टिळक विद्यालय, मुंबई |
| ५. | तनया वालम | पार्ले टिळक विद्यालय, मुंबई |
| ६. | अथर्व शिंदे | पार्ले टिळक विद्यालय, मुंबई |
| ७. | ऋतुजा बोडके | विद्यानिधी व्र.पा. हायस्कूल, जुहू |







विद्यानिधी स्कूल विजेते



पार्ले टिळक विद्यालय विजेते




# कशी असावी आपली दिनचर्या?

**– वैद्य उर्मिला पिटकर**

**आ**जकाल झोप लागत नाही, पोट साफ होत नाही, भूक लागत नाही अशा अनेक सामान्य भासणाऱ्या तक्रारी घेऊन, वृद्धांप्रमाणे तरुण मुलं-मुलीही आम्हा वैद्यांच्या दवाखान्यात मोठ्या प्रमाणावर येत असतात. वास्तविक भूक लागणे, पोट साफ होणे, शांत झोप लागणे, स्त्रियांची नियमित पाळी येणे या सर्व गोष्टी अत्यंत नैसर्गिक आहेत, पण त्यासाठी तरुण वयातही औषध घ्यावं लागणं ही गोष्ट मात्र अगदीच अनैसर्गिक!

शरीर हे निसर्गाच्या नियमानुसार चालते. जर निसर्गाचे नियम आपण पाळले, तर या सगळ्या गोष्टी आपसूकच नीट होतात, त्यामुळे अशा तक्रारींसाठी औषध न घेता, आपली दिनचर्या जर आपण सुधारली, तर प्रश्न मुळापासून सुटतो असा अनुभव येतो.

सध्या सामान्यपणे रात्री उशिरापर्यंत  जागणे, सकाळी उशिरा उठणे आणि दिवसभर जेव्हा जमेल तेव्हा लोळत राहणे, अशी प्रायः अनेक तरुण तरुणांची व प्रौढांचीही दिनचर्या दिसते, त्यातूनच या सर्व समस्यांचा उगम होतो.

दिवस व रात्र यांची 'सुरुवात- मध्य - शेवट' यात क्रमाने 'कफ -पित्त- वात' या शरीरातील कार्यकारीशक्ती प्रभावी असतात. या नियमाला धरूनच आयुर्वेदातील दिनचर्या बेतलेली आहे .

**आयुर्वेदात सांगितलेल्या दिनचर्येचा पहिला मुद्दा आहे-**

'ब्राम्हेमुहूर्ते उत्तिष्ठे' - म्हणजे सूर्योदयाच्या अगोदर दीड ते दोन तास उठणे हे आरोग्य रक्षणासाठी अत्यावश्यक आहे.

ब्राम्हमुहूर्तावर सकाळी चार ते सहा या काळात, 'शरीरातील सर्व हालचालींना कारणीभूत असणारा वातदोष प्रभावी असतो'. त्यामुळे या वेळी उठले तर पोट व्यवस्थित साफ होते.  एकदा पोट व्यवस्थित साफ झाले की चांगली भूक लागणं, शरीराला हलकेपणा येणं, उत्साह वाटणं या पुढच्या गोष्टी आपोआप घडतात. त्यामुळे सकाळी आठ-नऊ वाजेपर्यंत झोपणाऱ्या लोकांना, कितीही गोळ्या घेतल्या तरी 'शौचानंद' मिळत नाही.

सध्या वृद्धांप्रमाणेच प्रौढ, तरुण व अगदी लहान मुलांमध्येही लक्षात राहत नाही, विसरायला होते अशा प्रकारच्या तक्रारी आढळतात. ब्राह्ममुहूर्ताच्या सात्विक काळात, शरीर ताजेतवाने व मन शांत, प्रसन्न असल्याने, केलेले पाठांतर व अभ्यास हा सहजपणे आत्मसात होतो व दीर्घकाळपर्यंत लक्षातही राहतो, असा अनुभव येतो.

सकाळी सूर्योदयाच्या अगोदर उठायचं असेल, तर रात्री किमान दहा ते साडे दहापर्यंत, सर्व प्रकारची गॅझेट्स बंद करून झोपणं, हेही अत्यावश्यक आहे. तरच शरीराला पुरेशी विश्रांती मिळून झोपही पूर्ण होते व अन्नाचे नीट पचन होण्यासाठी पुरेसा वेळ मिळतो.

आपल्या शरीरातील पचनाचा संबंध पित्तदोषाशी आहे आणि पित्तदोषाचा संबंध हा शरीरातील अग्निशी. जेव्हा सूर्य उगवतो त्यावेळी  आपल्या शरीरातील अग्नी मंद असतो, पण जसजसा सूर्य डोक्यावर येतो, तसतसा आपल्या शरीरातील अग्नी प्रज्वलित होतो. त्यामुळे सकाळी दहा ते दोन या पित्त काळामध्ये, व्यवस्थित जेवून घ्यावे हे उत्तम!

संध्याकाळचे जेवण हे शक्य असल्यास सूर्य मावळण्याच्या आधी किंवा किमान सात वाजेपर्यंत घेतल्यास, त्या अन्नाचे सकाळी उठेपर्यंत व्यवस्थित पचन होते.

साधारण चाळीशीचा पुढील, सुखवस्तू  जीवनशैली असणाऱ्या लोकांनी, सकाळी नाश्ता करण्याऐवजी दहा ते अकरा या वेळामध्ये पूर्ण जेवण करून घ्यावे आणि संध्याकाळी ऑफीसमधून घरी आल्यावर, चहा- चिवडा न खाता, लवकरात लवकर जेऊन घ्यावे.

अशा प्रकारची जेवणाची वेळ ठेवल्यास, अनेक रोगांपासून आपलं संरक्षण होणार आहे.

अन्नाचे नीट पचन न झाल्यामुळे, तयार होणारा 'आमदोष' हाच बहुसंख्य रोगांचे कारण आहे. हा आमदोष तयारच झाला नाही, तर रोगनिर्मितीचे मुख्य कारणच उरत नाही.  शरीराचे सर्व व्यापार सुरळीतपणे चालतात. आणि प्रत्येक गोष्टीसाठी वेगवेगळी औषधे घ्यायची वेळच येत नाही.

दिनचर्येविषयी अजून जाणून घेऊया पुढील लेखात!

♦




# चला, झाडे जागी झाली, कामाला लागा !

– अर्चना नाईक

**नमस्कार मंडळी,**
थंडीचा सुखद गारवा हळूहळू कमी होऊ लागला आहे. आपली झाडे आता दीर्घनिद्रेतून (dormancy) उठतील. चला तर कामाला लागू या आणि पाहूया आता आपल्या झाडांना काय काय लागेल?



थंडीमध्ये कोरडी, रुक्ष हवा, तापमानातील फरक इत्यादी बदलांमुळे काही झाडांची पाने पिवळी पडली असतील. काही झाडांची पाने गळून गेली असतील, पण काही काळजी करू नका. आज आपण पाहू या की त्यांची मशागत कशा प्रकारे केली की ती ताजीतवानी होऊन परत जोमाने वाढतील.

१. सुकलेली, पिवळी पडलेली, तुटलेली, कुंडीत खाली पडलेली सर्व पाने काढून टाका. कारण ही पाने परत हिरवी होणार नाहीत, पण आपल्या झाडाची एनर्जी मात्र वाया घालवतील. म्हणून वेळीच त्यांना काढणे गरजेचे आहे.

२. कुंडीतील मातीला १/२ दिवस जरा पाणी देऊ नका. त्यानंतर खुरपणी किंवा तत्सम टोकेरी हत्याराने कुंडीतील माती उकरा. साधारणतः चार ते पाच इंच इतकी खालपर्यंत उकरत जा. भरलेली माती बाजूला काढून ठेवा. जर उकरताना तुमच्या लक्षात आले की माती फारच घट्ट झाली आहे किंवा त्या झाडाला आता ती कुंडी लहान पडत आहे तर कुंडी तिरकी करून सगळीच माती बाहेर काढा. टोकदार अवजाराने त्याची माती मुळापासून वेगळी करा. आधी होती त्यापेक्षा थोडी मोठी कुंडी घेऊन यामध्ये आपले झाड नव्याने लावा. आधी कंपोस्टचा थर घालायला विसरू नका.

३. जर झाडाला कुंडी बदलण्याची आवश्यकता नसेल, तर फक्त ४/५ इंच माती कमी करा, त्यामध्ये एक ते दीड इंच इतका आपल्या कंपोस्टचा थर भरा आणि त्यावर परत एक इंच आपण बाजूला काढून ठेवलेल्या मातीचा थर अशा रीतीने पसरवा की कंपोस्टचा थर दिसणार नाही.

*आता दोन गोष्टी लक्षात घ्या–*

a. कंपोस्ट हलके असते आणि पाणी घातल्यावर जर हा मातीचा थर नसेल तर ते वाहून जाईल म्हणून मातीचा थर खतावर घालणे आवश्यक आहे.

b. उन्हाळ्यात आपल्या झाडाला पाण्याची गरज जास्त आहे. त्यामुळे माती कुंडीमध्ये अगदी वरपर्यंत भरू नका. पाणी साचायला कुंडीत एखाद इंचाची जागा सोडा. म्हणजे आपण चार ते पाच इंची माती काढली. त्यावर एक ते दीड इंचाचा कंपोस्टचा थर घातला आणि एक ते दीड इंचाचा मातीचा थर घातला. तरी एक ते दीड इंचाचा कुंडीचा वरचा भाग रिकामा आहे म्हणजे आपण योग्य केल आहे.

४. आता आपली झाडे परत छान जोमाने वाढणार आहेत. तेव्हा त्यांचे कटिंग आपण आता करू शकतो. वरून चार ते पाच इंच कटिंग करून, त्या कटिंगची अनावश्यक पाने कमी करून, परत त्याच कुंडीत खोचून द्या म्हणजे तुमचे कटिंग नक्की रुजेल. याचे दोन फायदे होतील

a. तुम्ही झाडाचे प्रजनन करून आणखीन झाडे बनवू शकाल आणि मित्रमंडळींमध्ये वाटू शकाल.

b. तुमचे वेडेवाकडे वाढलेले झाड परत छान आकारात येईल.

५. वर सांगितल्याप्रमाणे काही झाडे थंडीमध्ये dormancy मध्ये जातात. अशा वेळेस त्यांचा पर्णसंभार देखील निस्तेज

*(पान २० पाहा...)*

अर्थवेध

# गुंतवणूक: हे लक्षात घ्या!

– **उदय पिंगळे,** *अर्थ अभ्यासक*

**गुं**तवणूक करण्यासाठी या काही महत्त्वाच्या गोष्टी लक्षात ठेवाव्या.

- आपली आर्थिक ध्येये नेमकी, वास्तवदर्शी, उद्दिष्टांशी संबंधित आणि कालबद्ध असावीत.
- प्रत्येक कार्यरत व्यक्तीचा जीवन विमा (टर्म इन्शुरन्स) वार्षिक उत्पन्नाच्या २० पट असणे आवश्यक आहे. याशिवाय शक्य असल्यास अपघात विमा आणि दुर्धर रोगांसाठीचा विमा घ्यावा.
- स्वतःचा तसेच कुटुंबातील प्रत्येक सदस्याचा आरोग्यविमा आवश्यक, संपूर्ण कुटुंबासाठी एकत्रित योजना घेता येईल. कोणतीही विशेष पूर्वअट नसलेल्या किमान विमा योजना सर्व कंपन्यांकडे उपलब्ध आहेत. जोखीम व्यवस्थापनाच्या दृष्टीने ते महत्त्वाचे आहे.
- गृहकर्जासोबत पुरेसे विमा संरक्षण आवश्यक असते.
- गृहकर्ज वगळून अधिक व्याजदर असलेली सर्व कर्जे लवकरात लवकर फेडावीत.
- व्याजदर वाढतील या भ्रमात राहू नये. अवास्तव व्याजदराचे आश्वासन देणाऱ्या योजनांना भुलू नये.
- बँकेतील ठेवी मर्यादित अर्थाने सुरक्षित असल्याने विभागून ठेवाव्यात.

**बाजारात उपलब्ध पर्यायी योजना पाहाव्यात.**

- सोन्यामध्ये गुंतवणुक करताना ईटीएफ, ई गोल्ड, सोवर्जिन बॉण्ड यांना प्राधान्य द्यावे. नव्याने उपलब्ध होणाऱ्या ईजिआरचा विचारही करता येईल.
- डेरीवेटीव प्रकारच्या गुंतवणुकीस सखोल ज्ञानाची आवश्यकता आहे. यात सर्वाधिक धोका असून मुद्दल पूर्णपणे जाण्याबरोबरच, त्याहूनही अधिक नुकसान होण्याची शक्यता आहे.
- शेअर्समध्ये धोका असला तरी नजीकच्या काळात त्यास कोणताही ठोस पर्याय नाही. बाजाराचा अंदाज घेऊन ज्या क्षेत्राचा भविष्यकाळ उज्वल आहे, त्या क्षेत्रातील गुंतवणुकीवर भर द्यावा. याशिवाय अप्रत्यक्षपणे अशी गुंतवणूक म्युच्युअल फंडाच्या माध्यमातून करता येईल. हमखास फायद्याचे दावे करणाऱ्यापासून दूर राहावे.
- दीर्घायुष्याचा विचार करून स्वतःची वेगळी निवृत्ती योजना आवश्यक असते. यासाठी उत्पन्नातील १०% रक्कम लवकरात लवकर गुंतवणे आवश्यक. जे निवृत्त झाले आहेत त्यांनीही ही सवय लावून घ्यावी. लवकर केलेल्या गुंतवणुकीवर चक्रवाढ गतीने लाभ होतो.
- आपल्या पूर्वीच्या गुंतवणुकीतून अपेक्षित दरापेक्षा खूपच जास्त परतावा मिळत असल्यास गरज असो अथवा नसो, त्यातील फायदा काढून त्यातून भांडवल निर्मिती करण्यावर भर द्यावा. यासाठी पीपीएफ, एनपीएसचा विचार करता येईल.
- इच्छापत्र लवकरात लवकर बनवावे. सर्व गुंतवणुकीची माहिती जोडीदारास आणि जवळच्या विश्वसनीय व्यक्तीस देऊन ठेवावी, यामुळे अचानक काही अरिष्ट ओढवल्यास त्याचा उपयोग होऊ शकेल.
- नफा–तोटा याविषयी असणाऱ्या भ्रामक कल्पना डोक्यातून काढून टाकाव्यात. खरेदी करून विक्री किंवा विक्री करून खरेदी असा पूर्ण व्यवहार झाल्यावरच नफा किंवा तोटा होतो. असे न करता होणारा नफा तोटा हा फक्त कागदी असतो.
- उत्पन्न व खर्च याची सांगड घालण्यासाठी आपल्या गरजा मर्यादित ठेवणे किंवा उत्पन्न वाढवण्याचे मार्ग शोधणे याला पर्याय नाही.
- प्रतिष्ठेविषयीच्या आपल्या खोट्या समजुती बदलणे गरजेचे आहे. केवळ ज्ञानानेच प्रतिष्ठा वाढते.
- क्रेडिट कार्ड केवळ खरेदीसाठी सोय म्हणून वापरावे. रोख रक्कम काढण्यास किंवा वस्तू हप्त्यांवर घेण्यासाठी त्याचा वापर करू नये.
- गुंतवणुकीच्या नोंदी व्यवस्थित ठेवून त्याच्या अटी, वारसनोंद, पुढील हप्ते भरण्याच्या तारखा, मुदतपूर्ती तारखा यांची माहिती सुरक्षित ठेवावी.
- गुंतवणूक संदर्भातील अनावश्यक कागदपत्रे संग्रही ठेवल्यास काही वर्षांनी गोंधळ उडण्याची शक्यता असते. त्यामुळे काम झाल्यावर अशी अनावश्यक कागदपत्रे लगेच नष्ट करावीत.
- आर्थिक नियोजन करताना व्यावसायिक गुंतवणूक सल्लागाराशी चर्चा करून निर्णय घ्यावा. बँकेतील रिलेशनशिप मॅनेजरकडून आपल्याला योग्य सल्ला मिळण्याची शक्यता कमी आहे.

यात उल्लेख केलेल्या पीपीएफ एनपीएस योजनांची माहिती आपण पुढील भागात घेऊयात. ♦

वाचू आनंदे

**एप्रिल २०२२ च्या वाटपातील पुस्तक**

- ***राजाचा घोडा आणि इतर कथा*** *: लेखक – राजीव तांबे; मेहता पब्लिशिंग हाऊस; छापील किंमत – १९५/-रु.; वाटपातील किंमत – १२९/-रु.*

# राजाचा घोडा आणि इतर कथा

**ल**हान मुलांना आकर्षित करेल असे एक पुस्तक यावेळी देत आहोत.

साहित्य अकादमीसह अनेक पुरस्कारांनी सन्मानित झालेले प्रसिध्द बाल-लेखक राजीव तांबे यांचे हे पुस्तक.




यात आहेत चार धमाल गोष्टी, बालकांना नक्की आवडतील अशा! यातले घोडा, चिमणी, जिराफ, बदकू हे हिरो मुलांना त्यांच्या भावविश्वातले वाटतील. मोठ्या आकाराच्या या पुस्तकात मोठाली पानभर चित्रे आहेत. साहिल उपळेकर यांनी चितारलेली ही चित्रे फारच बोलकी, रंगतदार व आकर्षक आहेत. सुरेख रंगसंगती, सुबक छपाई यामुळे हे पुस्तक देखणे झाले आहे. याच बरोबरीने 'फुले फुलली' व 'अजब डोंगर' हीही पुस्तके प्रसिध्द झाली आहेत.

वाटपात मात्र आपण यापैकी एकच पुस्तक देत आहोत.

जरूर घ्या हे पुस्तक. घरातल्या, नात्यातल्या, शेजारच्या लहानग्यांना नक्की भेट द्या. मुलांना लहान वयात वाचनाची आवड लावण्यासाठी आपण अशी पुस्तके त्यांच्या हाती द्यायलाच हवीत.

**– शुभदा चौकर**

---

# श्रध्दांजली

## ज्योत्स्ना कानेगांवकर



२६ जानेवारी २०२२ ला दादर-माहिम-वांद्रे विभागाच्या कार्याध्यक्ष ज्योत्स्ना कानेगांवकर यांचे अकाली दुःखद निधन झाले.

ज्योत्स्ना कानेगांवकर २०१४ पासून तीन टर्म विभागाच्या कार्याध्यक्ष म्हणून काम पाहात होत्या. तत्पूर्वी २०१२ मध्ये त्या विभागाच्या कार्यवाह होत्या आणि नीला आफळे, लीलाताई गोखले, शोभना वैद्य ह्यांच्या काळापासून बरीच वर्षे दादर-माहिम-वांद्रे विभागात समिती सदस्य म्हणून त्यांनी काम केले. ग्राहक शिक्षण विभागातही त्या कार्यरत होत्या.

ज्योत्स्ना मुंबई ग्राहक पंचायतीच्या कार्यकारिणीत २०१२-१३ वर्षासाठी निमंत्रित सदस्य राहिल्या होत्या. त्यानंतर त्या २०१३-१६ मध्ये कार्यकारिणीवर निवडून आल्या होत्या.

२००३ पासून बरीच वर्षे त्यांनी पंचायत पेठेच्या समितीत सदस्य म्हणून काम केले. नंतर २०१४-१५ ह्या वर्षासाठी, मुंबई ग्राहक पंचायत पेठ प्रभारी अध्यक्ष ही जबाबदारी उत्तमरित्या सांभाळली.

त्यांचा स्वभाव शांत, मनमोकळा आणि सर्वांना बरोबर घेऊन काम करण्याचा होता. दादर-माहिम-वांद्रे विभागाच्या बीज संकलनाच्या उपक्रमासाठी त्यांचा सहभाग असायचा.

अशा मनमिळावू कार्यकर्तीला आपण मुकलो आहोत. त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली.

## माधवी चंद्रात्रे

ठाणे येथील दीपसखी या ग्राहक संघातील सभासद माधवी मुरलीधर चंद्रात्रे यांचे ११ जानेवारी २०२२ ला वयाच्या ७५व्या वर्षी निधन झाले. गेली १५-१६ वर्षे त्या सातत्याने ग्राहक संघाच्या कामात कार्यरत होत्या.

# प्लास्टिक संकलनाला चालना

**– पराग रेडकर,** *पर्यावरण विभाग प्रमुख*

दरवर्षी १५ मार्च या जागतिक ग्राहक दिनासाठी Consumer International या ग्राहकांच्या शिखर संस्थेतर्फे एक विषय दिला जातो. २०२१ चा विषय होता– प्लास्टिक प्रदुषणाशी लढा!

करोना काळात आपल्या संस्थेच्या विविध विभागांनी ज्या विविध विषयांवर वेबिनार घेतले त्यात प्लास्टीक कचऱ्याची सुयोग्य विल्हेवाट, इ–कचरा निर्मूलन, आपल्या घरातील ओला–सुका कचरा वर्गीकरण, घराच्या घरी खत निर्मिती, किचन गार्डन अशा अनेक विषयांवर विविध विभागांत ऑनलाईन कार्यक्रम झाले.



आभासी पद्धतीने विभागातर्फे घेतलेल्या webinar मधून जागरूकता वाढीस लागली. प्रतिसाद चांगला मिळू लागला. अनेक ठिकाणी कृतिशीलताही दिसून आली. घरांमधील कचऱ्यात असलेले घटक पुनःचक्रीत करण्यासाठी स्वारस्य दाखवणारे अनेक जण हिरीरीने पुढे आले. सुका कचरा व ओला कचरा वेगळा करून न थांबता घरातील expired औषधे तसेच इलेक्ट्रॉनिक कचरा उचित माध्यमातून सत्कारणी लागावा म्हणून पाठपुरावा करू लागले. स्वेच्छेने स्वखर्चाने वृक्षलागवड करणे, सौर ऊर्जा वापरण्यासाठी पॅनल बसवणे, अपारंपरिक ऊर्जेचा वापर करणे तसेच ओला कचरा कटाक्षाने वेगळा काढून घरातल्या घरात फुलबाग फुलवणारे, भाजी लावणारे देखील तयार झाले. आपल्या ग्राहक सभासदांतील समविचारी पर्यावरणप्रेमी मंडळींना सुका कचरा डंपिंगला जाणे खटकू लागले. अनेक सभासदांनी जसे जमेल तसे संघटित व वैयक्तिक पातळीवर सुका कचरा जमा करणारे गट तयार केले. सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या काही संस्थांशी संपर्क साधून सुका कचरा पुनर्चक्रीकरणातून वापरात यावा, यासाठी काहीजण कार्यरत झाले.

मुंबईस्थित बिसलेरी कंपनीच्या मार्फत उपलब्ध असलेल्या मोबाईल ॲपच्या द्वारे आपले अनेक संघ कंबर कसून कामाला लागले. आपल्या पर्यावरण विभागाच्या माजी प्रमुख स्वाती टिल्लू, EnviroVigil चे सर्वेसर्वा विद्याधर वालावलकर यांनी केलेल्या मार्गदर्शनानुसार सभासदांनी गट बनवून प्लास्टिक कचरा संकलनास सुरुवात केली. ठाणे, अंधेरी, सांताक्रुझ, गोरेगांव, दादर इ. विभागांमध्ये असे काम सुरू झाले.

'ग्राहक तितुका मेळवावा' या आपल्या मासिकातून डॉ. सुषमा गांगल यांनी विविध उदाहरणे देत प्लास्टीकचा वापर व विल्हेवाट यावर विस्तृतपणे लेख लिहीले.

दादर–माहीम येथील अलका मोकाशी, सागर नारकर, शर्मिला कर्वे, रंजना मंत्री, सप्रे तसेच वसई येथे किर्ती शेंडे, फलटणकर, साटम, अरुणा बापट, वर्तक, प्रियांका पाटील, निनाद म्हात्रे, गोरेगावमध्ये मयुरा गोडबोले, मंजिरी मोघे, स्वप्नील काळे, अलका प्रधान, सुषमा मेस्त्री, शिल्पा भोबे, डॉ. सोहनी, ऐश्वर्या साळवी, सांताक्रुझमधील वृषाली ठवाळ, विद्या पेडणेकर, ममता आठल्ये, गीता शेणॉय, लिखिते, पाटणकर, मेधा गौड यांनी पटापट समन्वय साधून whatsapp गट तयार केले. चेंबूरच्या वैद्य भाग्यश्री टिळक, सुमन राव, रेखा जवर, रोहित बागुल, लता नायर, गौरी नाडकर्णी, सुमंगला पाठक तर कांदिवलीतील विजय वगळ, नीना पाटील, अंधेरीच्या ज्योती मोडक, भाग्यरेखा जोशी, विद्या आपटे शिवाय बोरीवलीहून रेखा शेटे व अनिता गोंधळेकर यांनी देखील पुढाकार घेऊन आपापल्या परिसरात जनजागृती करून प्लास्टिकचे संकलन होण्यासाठी मेहनत घेतली. (काहींची नावे राहून गेली असतील, क्षमस्व!)

प्लास्टिक संकलन करणाऱ्या संस्था, कंपन्या यांच्याशी संपर्कात राहून अनेक ठिकाणी प्लास्टिकचे संकलन सुरू झाले आहे. अनेक ठिकाणी सुरवातीला एका वेळी तीन, चार किलो असणारा कचरा पन्नास किलोवर पोचला. ज्या इमारतीत ग्राहक संघ आहे, तेथील सभासदांनी त्यांच्या या उपक्रमात सोसायटीतील मंडळींनाही सामील करून घेतले. वैयक्तिक सहभागाने पर्यावरण संरक्षित ठेवण्यासाठी असेच प्रयोगशील व सक्रिय कार्यकर्ते मिळणे हीच आपली नेहमीप्रमाणेच जमेची बाजू आहे. आता तर सुरुवात आहे, अजून खूप मोठा पल्ला गाठायचा आहे. ♦

# उत्पादक असे घडतात!

– रंजना मंत्री

**शि**क्षण विभागाची फेब्रुवारी महिन्याची मासिक बैठक गुरुवार दि. ३ फेब्रुवारी रोजी पार पडली. या ऑनलाईन बैठकीत 'ग्राहकोपयोगी उत्पादनांची जन्मकथा-कल्पना-प्रयोग-कसोट्या-विपणन' या विषयावर डॉ. सुषमा वाघ यांचे भाषण झाले.

उपस्थितांचे स्वागत आणि प्रास्ताविक मंगला गाडगीळ यांनी केले आणि पाहुण्यांची ओळख उदय पिंगळे यांनी करून दिली. डॉ. सुषमा वाघ यांनी सुरुवातीला उत्पादन आणि त्यांचे वेगवेगळे प्रकार सांगितले. त्यांच्या भाषणात त्यांनी काही व्यवसायांच्या जन्मकथा कथन केल्या.




रविंद्र प्रभुदेसाई यांनी वडिलांकडून व्यवसाय हातात घेतला खरा परंतु तो नुकसानीत गेला. त्यानंतर त्यांनी साबण बनवायला सुरवात केली. पण याचा खात्रीपूर्वक खप नाही हे त्यांच्या लक्षात आले. बाजारात साबणाच्या मोठ्या ब्रॅन्डच्या काही कंपन्या होत्या, त्यात निभाव लागणे कठीण होते. नंतर त्यांच्या लक्षात आले की, तांब्या, पितळेच्या भांड्याना चकचकीत करण्यासाठी मार्केटमध्ये काही उत्पादन उपलब्ध नाही. तेव्हा त्यांनी उत्पादन बनवले. काही मुलांना हाताशी धरून, ते उत्पादन चाळीतल्या बायकांना नेमके भांडी घासताना पोहोचवले. यावेळी त्यांच्या प्रयत्नाला मात्र चांगलेच यश आले व पितांबरी हे उत्पादन लोकप्रिय झाले. 'नावात काय असते' म्हणताना पितळ व तांबे हे दोन्ही शब्द मिळून दिलेले 'पितांबरी' हे 'ब्रॅन्ड नाव' फारच परिणामकारक ठरले. उत्पादन तयार झाल्यावर त्याचे मार्केटिंग/विपणन करण्यासाठी मार्केट रिसर्च करावा लागतो. उत्पादनाला मार्केटमध्ये कोणते स्थान असावे, ते कोणत्या शेल्फवर असावे, पॅकिंग कसे असावे, प्रत्येक ग्राहकापर्यंत कसे पोहोचेल यासारख्या अनेक गोष्टींचा विचार करावा लागतो. पितांबरीचा आता खाद्यान्न, आरोग्य, सोलर उत्पादने यांची विक्री आणि निर्यात तसेच ॲग्रो टुरिझमपर्यंत व्यवसायवृद्धी झालेली आहे.

निरमा..... करसनभाई शहा यांची मुलगी निरूपमा हिचं अपघातात निधन झालं. तिचं नाव अजरामर रहावं या प्रबळ इच्छेमुळे शहा यांनी 'निरमा' साबण तयार केला. ते केमिस्ट असल्याकारणाने यातलं त्यांना ज्ञान होतं. दिवसभर नोकरी करून आल्यावर घराच्या मागे असलेल्या छोट्याश्या १०० स्क्वेअर फूट जागेत ते यावर काम करू लागले. त्यातून तयार झालेले साबण दर दिवशी ऑफिसला जाताना वाटेत विकू लागले. या प्रयत्नात त्यांना चांगल यश मिळालं व 'निरमा' मार्केटमध्ये आला.

फेअर ॲन्ड लव्हली ....१९७१ साली कंपनीला पहिलं पेटन्ट मिळालं. लग्नाच्या बाजारातला 'गोरी व सुंदर मुलगी हवी' हा आग्रह, हे उत्पादन बाजारात येण्यास कारणीभूत ठरला. अशाप्रकारची नवीन उत्पादने तयार करण्यापूर्वी कंपनीला खूप रिसर्च करावा लागतो, महिलांच्या त्वचेवर त्याचे प्रयोग करून बघितले जातात, प्रॉफिट सेन्टरबरोबर चर्चा करावी लागते व त्यानंतर खप होण्यासाठी जाहिरातीतून ग्राहकांचे ब्रेन स्टॉर्मिंग केले जाते. हे उत्पादन बनवण्यापूर्वी चक्क बेडकाच्या कातडीवरील काळ्या ठिपक्यावर प्रयोग करून बघितले गेले. त्यानंतर महिलांच्या त्वचेवरही याच्या बऱ्याच टेस्टस घेतल्या गेल्या. 'फेअर ॲन्ड लव्हली' हे आकर्षक नाव खूपच परिणामकारक ठरले व मार्केटचा ८०% हिस्सा बनले. त्वचेवर याचा कसा परिणाम होतो हे सांगताना त्यांनी त्वचेची रचना समजावून सांगितली.

'एपिडर्मिस' म्हणजे त्वचेचा सगळ्यात वरचा थर. यात पेशींचे २० थर असतात व डर्मिस हा खालचा थर असतो ज्यातून रक्तवाहिन्या जातात. या थरात 'मेलेनिन' म्हणजे काळा रंग किंवा काळं पिगमेन्ट तयार करणाऱ्या पेशी असतात. मेलेनिनस ग्रॅन्युलस त्वचेच्या एपिडर्मिसपर्यंत पोचवल्या जातात व त्यामुळे त्वचेला काळा, सावळा, गहूवर्ण रंग प्राप्त होतो. फेअर ॲन्ड लव्हलीमध्ये B३ व इतर कलर ॲक्टिव्हेट वापरलेले असतात. (यात ब्लिच नसतं) त्वचेतील B३ ची कमतरता हे क्रिम नियमित वापरल्याने भरून काढली

जाते व रंग उजळ होतो. ही उजळ होण्याची क्षमता, त्या व्यक्तीच्या दंडाच्या खालच्या बाजूच्या रंगाइतकीच असते. गोऱ्या लोकांच्या त्वचेमध्ये हे मेलेनिन नसते.

नॉनस्टिक कुकवेअर.... नॉनस्टिकचा १९३० साली शोध लागला. १९६८ साली पहिला वापर झाला. नंतर त्यात निर्लेप कंपनी उतरली व हे उत्पादन इंडस्ट्रियल स्केलला पोचलं. स्वयंपाक घरातील नॉनस्टिक तवा/भांडी वापरण्यामधील धोका आणि घ्यायची खबरदारी त्यांनी सांगितली. धोका असा की, तवा/भांड्यावर कोटिंग देण्यासाठी poly tetra fluoro ethylene (PTFE) वापरतात व यासाठी जे Trifluoroactic acid (TFOA) वापरलं जातं ते तवा-भांड गरम केल्यावर कारसिनोजेनिक (कर्करोगाला आमंत्रण देणारे) पदार्थ रिलीज करतं. ते आरोग्याला अतिशय हानिकारक असल्याने खबरदारी म्हणून, तवा-भांडी वापरताना कमी किंवा मध्यम आचेवर ठेवावी. त्यात पाणी वा तेल घालून गॅसवर ठेवावे नुसतेच गरम करू नये. तसेच त्यावर लाकडी कालथाच वापरावा. दोन-तीन वर्षानंतर नॉनस्टिक तवे-भांडी बदलावे. पापुद्रे गेलेले, चरे पडलेले तवे-भांडी अजिबात वापरू नये. १९१३ सालानंतर तांत्रिकदृष्ट्या कमी हानिकारक भांडी बनू लागली आहेत तरीसुद्धा पूर्वी वापरले जाणारे लोखंडी/बिडाचे तवे वापरल्यास उत्तम. ते सिझनिंग करण्यासाठी, लोखंडाचे तवे वापरल्यानंतर साबण न लावता स्वच्छ पुसून घ्यावे, तेल लावून गरम करावे व पुसून घ्यावे, असे दोन/तीन वेळा करावे. असे केल्याने तव्याला गंज चढत नाही व पुन्हा वापरताना जिन्नस करपत नाही. हा मोलाचा सल्ला त्यांनी दिला.

प्रेशर कुकर... याचा शोध १७०० च्या दशकात आल्फ्रेड विशर यांनी लावला व अमेरिकेतच पहिल्यांदा वापरला गेला. १९४९ पासून कुकर भारतात घराघरात जाऊन पोचला. कुकर वापरताना, त्यातील पाण्याची वाफ तोटीतून सरळ रेषेत बाहेर येऊ लागली की मगच त्यावर शिटी ठेवावी. शिटी वाफेवर हलू लागली की कुकरखालची उष्णता कमी करून (शिटी होऊ न देता) आठ-दहा मिनिटांनी गॅस बंद करावा. कोणताही पदार्थ शिजवताना अशीच पध्दत ठेवावी. कुकरवरची शिटी, आतली वाफ बाहेर घालवण्यासाठी नसते तर कुकरमधलं तपमान वाढविण्यासाठी असते. शिटी होऊन वाफ बाहेर पडल्यास इंधन वाया जाते. हा महत्त्वाचा मुद्दा त्यांनी सांगितला.

आईस्क्रीम ....आईस्क्रीम हे दुधाला पर्याय आहे असे अनेक आयांचा चुकीचा समज असतो. आईस्क्रीममध्ये फक्त ३०% दूध आणि बरीचशी हवाच असते. आईस्क्रीम जेव्हढे फ्लफी तेव्हढी त्यात हवा जास्त. शिवाय साखरही मुबलक प्रमाणात असते.

प्रेक्षकांचे प्रश्न त्यांच्यावतीने अंजली पोतदार यांनी विचारले आणि आभार प्रदर्शन केले. राजेंद्र राणे यांनी कार्यक्रमासाठी पोस्टर बनविले होते तर तांत्रिक मदत आलोक हर्डीकर यांनी केली.

♦

---

*(...पान १५ वरून)*

## चला, झाडे जागी झाली, कामाला लागा !

दिसतो. जुनी पाने गळून पडतात. अशा वेळेस झाडांच्या पानांवर पाण्याचा स्प्रे मारल्याने त्यांच्यावरील धूळ निघून जाते, पाणी स्वच्छ होतात, पर्ण छिद्रे मोकळी होतात. अशावेळेस त्यांच्यावर विविध bio enzymes स्प्रे मारल्यामुळे पाने परत टवटवीत आणि ताजीतवानी दिसू लागतात.

६. यावेळी जर आपण विविध औषधी स्प्रे मारले जसे की, नीम ओईल स्प्रे, जीवामृत स्प्रे, किंवा द्रवरूप खतांचे स्प्रे तरी आपली झाडे खूप छान टवटवीत होतात.

७. कुंडीतील माती वेळोवेळी उकरण्याची सवयच लावून घ्या. त्यामुळे मुळांना हवा पोहोचते. आणि कुंडीतील माती दगडासारखी घट्ट बनत नाही. जास्त करून आपण बाल्कनी ग्रील मध्ये किंवा घरामधील कुंड्या प्लास्टिक किंवा सिरॅमिकच्या वापरतो. माती जर भुसभुशित नसेल तर झाडाच्या मुळांना मोकळी हवा न मिळाल्यामुळे झाडांची वाढ देखील खुरटते आणि टवटवीतपणा नाहीसा होऊन झाडे निस्तेज, मलूल दिसू लागतात.

८. आपल्या ग्राहक पंचायतीमध्ये गांडूळ खत वर्षातून दोनदा मिळते. ते तुम्ही नक्की वापरून बघा. मला स्वतःला त्याचा खूप चांगला अनुभव आहे.

चला तर मग लागूया कामाला. ♦

# FSSAI's Stand on GM Food

**- Compiled by Vasundhara Deodhar**

***During the month when the world is observing WCRD, the draft on GM foods by FSSAI does not seem to be serious about the safety of Consumer health.***

The Food Safety Authority is back in the middle of a controversy related to its primary job—of ensuring safe and wholesome foods (for all citizens). In the name of draft regulations related to GM foods, it is apparently proposing to create such a lax regulatory regime that any genetically modified (GM) food approved in other countries is likely to be approved in India. This has predictably led to intensified campaigns by aware citizens who have managed to get an extension of the public feedback deadline. (It was 5th February from the earlier 15 January.)




Ironically, this is happening when none other than the Prime Minister of India has emphasised taking agriculture out of the chemistry lab. One would presume that he is talking about taking it out of the biochemistry and molecular biology labs too, where the unnatural is being evolved in irresponsible and irreversible experimentation.

Genetically modified or GM foods have been documented in scientific studies to cause various adverse health effects potentially. They can affect immunity, reproductive health, vital organs and their functioning, growth and development of an organism and so on. Individual toxic genes as well as the GM process itself, along with deadly chemicals used with GM crops, seem to be responsible for such impacts. In Europe and elsewhere, aware consumers have ensured that such GM foods have no demand and, thereby, markets.

The irony of the situation here in India, where the food safety regulator proposes easy ways of foisting GM foods on unaware and unwilling citizens, goes back to creating the Food Safety and Standards Act 2006 itself. In February 2006, the standing committee on agriculture, to whom the Bill was referred to, tabled its report in the Parliament. This Committee recommended that a proposed food authority be called 'Food Safety Authority' and that the ministry of health administer the statute. Parliamentarians, who participated in the debate in both Houses, were clearly concerned about GM foods and corporatisation of our food systems, with names of companies like Pepsi, Nestlé and Monsanto explicitly taken.

The discussions expressed concerns about food that the poor in the country consumes. In the implementation of the law, the Food Authority, despite being in existence for many years now, was over-enthusiastic about regulating organic foods, which essentially is in line with the very mandate of the Authority (safe food), but did not bother about regulating (illegal) GM foods in the country, despite complaints by civil society organisations.

Years after committing in the Supreme Court about putting into place its regulations soon, the Food Safety and Standards Authority of India (FSSAI) finally came up with draft regulations in November 2021 and sought public feedback. In the forms annexed to the proposed regulations, one can realise that FSSAI will make approvals in other countries as the basis for approvals here.

While the draft speaks about the 'Authority' processing applications, the 'Authority' by law does not have any safety experts! It has ministerial representatives along with industry, retail, farmer and consumer representatives. Additionally there is just a passing mention of how approvals or rejections will be based on biosafety assessment,

Even though labs can detect GM adventitious presence at 0.01% limit of detection (LOD), FSSAI is proposing labelling with a threshold of 1% for individual GM ingredients, denying consumers their right to know and right to informed choices.

In fact, these draft 'regulations' are not worth the name at all, even as these regulations also seek to weaken the meagre and lackadaisical law further that genetic engineering appraisal committee (GEAC) does, under the Environment Protection Act (EPA), 1986.

Importantly, there is nothing in these draft regulations about state governments and their policies concerning GM foods, even though public health is a state subject as per the Constitution of India.

FSSAI is aiding the industry by proposing the current kind of regulations. It is time that state governments and citizens woke up to the danger being posed by FSSAI, and ensure that the food safety regulator upholds their wish to remain GM-free.

Online petitions have been initiated for this purpose and more detailed feedback also is sent to the regulator by many organisations and experts.

The provision related to infant foods reveals that FSSAI can have a prohibitory approach if it chooses to. This was adopted in a precautionary manner and rightly so.

FSSAI has to ensure that a precautionary approach is followed for all GM foods and all food consumers and not just infants.

(Excerpts from an article by Kavitha Kuruganti is with the Coalition for a GM-Free India and works on issues related to farmers' rights, sustainable farm livelihoods and food safety)

*Courtesy - Money Life.*

# CI theme- Fair Digital Finance

Every year, on March 15, the consumer movement celebrates World Consumer Rights Day, raising global awareness of consumer rights, consumer protection and empowerment. Consumers International (CI) announced the theme for World Consumer Rights Day 2022 as Fair Digital Finance.

Digital financial services have created new risks along with traditional risks that can lead to unfair outcomes for consumers and leave those who are vulnerable behind in an increasingly cashless society.

There is strong evidence to suggest these risks have increased in recent years and crises such as the COVID-19 pandemic have enhanced these risks, where vulnerable consumers are more fragile due to economic hardship. Achieving fair digital finance for all requires a global, collaborative, and coordinated approach. The rapidly evolving and complex nature of digital financial services demonstrate the need for innovative regulatory approaches and digital financial services and products that centre consumer protection and empowerment.

It is more important now than ever to build on our knowledge and work together to understand what fair financial services looks like in a digital world, and what role consumer-centred financial services can play in global challenges like sustainability. 2022 will be a crucial moment for change with upcoming international policy moments such as the G20 and OECD review of High-level Principles on Financial Consumer Protection.

♦

# MGP seeks transparency in premium waiver

Mumbai Grahak Panchayat (MGP) has written to the Maharashtra Real Estate Regulatory Authority (MahaRERA) demanding a probe into whether developers who availed of the 50 percent cent concession scheme on fungible FSI premiums have paid the stamp duty on the flat purchase's behalf and passed on the benefit of concession to the home buyers.



Adv. Shirish Deshpande in his letter to MahaRERA chief Ajoy Mehta dated January 31 said "There was a specific condition imposed that the promoters/builders should bear the full cost of stamp duty' on behalf of the homebuyers and produce certificates to that effect. It is, however reported in a section of media that although most of the promoters/builders in the MMRDA region have opted for the scheme announced by the government, they have not passed on this benefit of stamp duty waiver to the eligible homebuyers. He added that the MGP believes in such possibility since this condition of promoters/builders absorbing the cost of stamp duty on behalf of home buyers was not adequately publicized and as such most of the homebuyers appear to be unaware about it.

Deshpande also submitted the Maharashtra government circulars dated December 11, 2019 and February 23, 2021, as well as the draft undertaking to be given by the promoters to MHADA on the concerned town planning authority stating that the promoter undertakes to pay the entire stamp duty of prospective buyers for the area for which 50 percent reduction in premium is availed of.

The undertaking also includes clauses that state that the promoter will submit the certificates from the home buyers indicating that their stamp duty has been paid by the developer. The undertaking further states that the promoter will display a list of all beneficiaries of stamp duty on the promoter will display a list of all beneficiaries website, and that the promoter will submit the list of beneficiaries to MahaRERA.

Deshpande said under section 35 of the Real Estate (Regulation and Development) Act (RERA). MahaRERA has powers to call for information and conduct investigations on a complaint or suo moto to furnish information or explanation from promoters or appoint an inquiry panel to probe the affairs of any promoter. He also mentioned that under section 37 of RERA, MahaRERA has powers to give directives to promoters from time to time. If deemed necessary.

Deshpande urged Mehta to direct developers who have availed the benefits of the premium concession scheme to provide information to MahaRER anout the names of the beneficiary homebuyers in each such project along with copies of their certificates. He also demanded that the authority ask all such developers to disclose on their MahaRERA project registration pages that they have availed 50 percent concession offered by the government and no stamp duty is payable by the home buyers for that project.

*- Courtesy - Satish Nandgaonkar,*
*The Free Press Journal*

• Postal registration No. MCN/158/2020-2022 • WPP License No. MR/TECH/WPP-137/North/2020-2022
• License to post without prepayment, on 5th & 6th • Vile Parle (W) P.O. Mumbai 400 056

RNI No. MAHBIL/2011/39044



# मधुकरराव मंत्री जन्मशताब्दीनिमित्त त्यांच्या कुटुंबियांनी आपल्या संस्थेच्या सर्व सद्य कार्यकर्त्यांचे केलेले हे कौतुक! त्यांनी दिलेले हे मानपत्र सर्व कार्यकर्त्यांना अधिक काम करण्याची उमेद देईल!!



स.न.वि.वि.

२६-०१-२०२२

आमचे वडिल श्री. मधुकर मंत्री, मुंबई ग्राहक पंचायत संस्थापक सदस्य, यांची आज जन्मशताब्दी!

मुंबई ग्राहक पंचायत संस्था १९७५ साली गुढीपाडव्याच्या दिवशी स्थापन झाली, तेव्हापासून आपले निकटचे संबंध जुळून आले. १९७५ साली लावलेले हे इवलेसे रोप, त्याचा आज ४६ वर्षांनंतर कार्यकर्त्यांच्या योगदानातून वटवृक्ष झाला आहे. संस्थेच्या १९ भौगोलिक विभागातून २,५६७ संघ, ३२,००० ग्राहक सभासद असा विस्तार झाला आहे. ग्राहकांच्या तक्रार निवारणासाठी मार्गदर्शन यंत्रणा कार्यरत आहेत. आशिया खंडातील या सर्वात मोठ्या संस्थेची किर्ती थेट साता समुद्रापार पोचली आहे.

संस्थेच्या या यशस्वी व गौरवशाली वाटचालीतील सर्व सहभागी कार्यकर्त्यांचा मंत्री परिवार विशेष सन्मान करू इच्छितो. ही मधुकररावांनी पाठीवर दिलेली शाबासकी असे समजून या स्मृतीचिन्हाचा स्विकार करावा ही विनंती.

आपले संबंध असेच दृढ राहोत ही प्रार्थना व पुढील वाटचालीसाठी शुभकामना!!

समस्त मंत्री परिवार !

